# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०२०

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### पिंपळी रस्त्यावरील खानापूर (जि.परभणी) स्मशानभूमीलगत रस्त्यावर होत असलेले अनधिकृत बांधकाम

**(१) १०५ (०२-०४-२०२०). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळी रोडवरील खानापूर (जि.परभणी) स्मशानभूमीलगत विद्यापीठ संरक्षक भिंतीलगत असलेला रस्ता वसमत रोडवर अडविण्यात आला असून सदर रस्त्यावर ग्रिनबेल्ट असलेल्या जागेत अनधिकृत प्लॉट पाडून या ठिकाणी बांधकाम करण्याचा प्रयत्न सुरु असल्याची तक्रार शिवसेना पक्षाचे विभागप्रमुख यांनी आयुक्त, परभणी महानगरपालिका यांच्याकडे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, अंतर्गत रस्ता मुख्य रस्त्यास तातडीने जोडण्यात यावा अशी मागणीही या निवेदनात करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-१०-२०२०) :** (१) व (२) हे खरे आहे.

• या बाबतचे निवेदन शिवसेना विभाग प्रमुख, परभणी यांनी दिनांक १३.१.२०२० रोजी आयुक्त, परभणी महानगरपालिका यांना दिलेले आहे.

(३) परभणी शहराच्या मंजूर विकास योजनेमध्ये परभणी ते खानापूर ते पिंगळी कडे जाणारा गावरस्ता हा विद्यमान रस्ता म्हणून दर्शविण्यात आलेला आहे.

• सदर रस्ता परभणी ते बसमतकडे जाणाऱ्या राज्य रस्त्यास ज्या ठिकाणी छेदतो त्या क्षेत्रात टीन शेडचे अनधिकृत बांधकाम करण्यात आलेले आहे.

• सदर अनधिकृत बांधकामाबाबत संबंधितास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ कलम ५४ अन्वये महानगरपालिकेने नोटीस बजावली आहे.

• प्रस्तुत अनधिकृत बांधकाम हे खानापूरकडे जाणाऱ्या गावरस्त्यावर आहे किंवा कसे याकरिता मोजणी करण्याबाबतचा प्रस्ताव भूमी अभिलेख कार्यालयाकडे महानगरपालिकेने दि.२.३.२०२० अन्वये पाठविलेला आहे.

• प्रस्तुत रस्त्याचे मोजणी नकाशा प्राप्त झाल्यानंतर अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याबाबत नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येवून रस्ता मोकळा करण्यात येईल, असे परभणी शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद येथील शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे स्मृतिवन स्थळाच्या विकासासाठी केलेली वृक्षतोड**

**(२) १२९ (०२-०४-२०२०). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथे विकसित करण्यात येत असलेल्या शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे स्मृतिवन स्थळाच्या विकासासाठी औरंगाबाद महानगरपालिकेने ४०० झाडे तोडली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औरंगाबाद येथे दिनांक ९ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास झालेल्या कार्यक्रमात या स्मृतीस्थळाच्या विकासासाठी ‘एकही झाड तोडू देणार नाही तर झाडे लावणार’ असे मा.मुख्यमंत्र्यांनी घोषित केले असले तरी यापूर्वी महानगरपालिकेने ४०० झाडे या स्मृती स्थळाच्या विकासासाठी तोडली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आरे वसाहतीतील कारशेडला वृक्षतोडीच्या कारणावरुन स्थगिती देण्यात आली तर स्मृतिवन स्थळाच्या विकासासाठीच्या वृक्षतोडीकडे दुर्लक्ष करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-१०-२०२०) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

• औरंगाबाद येथील स्व.बाळासाहेब ठाकरे स्मृतिवन स्थळाच्या विकास कामास अद्याप पर्यंत सुरुवात झालेली नसल्यामुळे या परिसरातील कोणतीही झाडे तोडण्यात आलेली नसल्याचे औरंगाबाद महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर येथील म्हाळगीनगर चौक ते हुडकेश्वर रोड येथील रस्त्यांची कामे अपूर्ण असल्याबाबत**

**(३) २२८ (२०-०३-२०२०). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील म्हाळगीनगर चौक ते हुडकेश्वर रोड तसेच इतरत्रही जागोजागी रस्त्यांच्या काँक्रिटीकरणाची कामे तसेच इतरही डागडुगीची कामे सुरु करण्यात आली आहेत त्यापैकी बहुतांश ठिकाणी ही कामे अर्धवटच सोडण्यात आल्याने नागरिकांना ये-जा करतांना गैरसोय होत असून तेथे अपघातही होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-१०-२०२०) :** (१), (२) व (३) नागपूर येथील म्हाळगीनगर चौक ते हुडकेश्वर रोड पैकी म्हाळगीनगर चौकाचे बांधकाम हे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत पूर्ण करण्यात आले असून, ते सुस्थितीत आहे. मात्र नागपूर मनपाच्या जलप्रदाय आणि विद्युत विभागाकडून, या ठिकाणी खोदकाम करण्यात आले असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाने कळविले आहे.

सदरचे खोदकाम केल्यानंतर, येथील खड्डा, नागपूर महानगरपालिकेकडून पूर्ववत करण्यात आल्याचे, नागपूर महानगरपालिकेच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

शहरात सुरु असलेल्या सिमेंट रस्त्याच्या कामांच्या बाबतीत, टप्पा-२ अंतर्गत एकूण ५९ रस्त्यांची २२ पॅकेज मध्ये विभागणी केली असून, यापैकी २० पॅकेजमधील ५३ रस्त्यांची (लांबी ५०.८० कि.मी.) कामे पूर्ण झाली आहेत. उर्वरित २ पॅकेजमधील ३ रस्त्यांची (लांबी २.८१ कि.मी.) कामे प्रगतीपथावर असून, यातील ०३ रस्त्याचे काम अद्याप सुरु झालेले नाही.

सिमेंट रस्त्याची कामे सुरु करताना, शहर वाहतूक पोलीस यांची परवानगी घेणे, संपूर्ण रस्ता बंद न करता, रस्त्याचे एकाच बाजूने सिमेंट रस्त्याचे काम करणे, वाहतूक सुरु राहण्यासाठी वार्डन ची नियुक्ती, दिशादर्शक, काम सुरु असल्याचे फलक, लावल्यानंतरच सिमेंट रस्त्याची कामे सुरु केली जातात. तसेच शहरात इतरत्र रस्त्यावरील वाहतूक सुरळीत व सुरक्षित व्हावी यासाठी आवश्यक पॅचवर्क/डागडुजी वेळोवेळी केली जाते.

---

**नागांव-पिराणीपाडा, भिवंडी (जि.ठाणे) येथे होत असलेले अनधिकृत बांधकाम**

**(४) २३४ (०२-०४-२०२०). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

वि.स. १७ (४)

(१) भिवंडी (जि.ठाणे) शहरातील शांतीनगर भागातील नागांव-पिराणीपाडा येथे मौजे नागाव सर्व्हे क्रमांक ९८ / २० या भूखंडावरील जुना घर क्रमांक २४३१ या ठिकाणी तळ अधिक पाच मजल्याच्या अनधिकृत इमारतीचे बांधकाम करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनधिकृत बांधकाम प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाने विकासकाला १० लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, इमारतीस संरक्षण देणाऱ्या प्रभाग अधिकारी आणि उपायुक्तांवर निलंबनाची कारवाई करण्याची मागणी भिवंडी महानगरपालिका विरोधी पक्षनेते यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, विरोधी पक्षनेता, भिवंडी महानगरपालिका यांनी केलेल्या मागणीनुसार अनधिकृत बांधकाम करणारे विकासक आणि त्यांना संरक्षण देणारे अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-१०-२०२०) :** (१) भिवंडी (जि.ठाणे) शहरातील शांतीनगर भागातील नागांव-पिराणीपाडा येथे मौजे नागाव सर्व्हे क्रमांक ९८ / २० या भूखंडावरील जुना घर क्रमांक २४३१ या ठिकाणी तळ अधिक पाच मजल्याच्या अनधिकृत इमारतीचे बांधकाम करण्यात आले होते अशी वस्तुस्थिती भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने कळविली आहे.
(२) मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक १०.०७.२०१९ च्या आदेशान्वये सदर अनधिकृत बांधकाम प्रकरणी बांधकामधारक यांना रुपये १० लक्षची रक्कम महाराष्ट्र स्टेट लिगल सर्विसेस ॲथोरीटी यांच्याकडे जमा करण्याचे आदेश पारीत केले होते.
(३) भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका यांनी कळविल्यानुसार विरोधी पक्षनेता, भिवंडी यांनी भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका क्षेत्रात अनधिकृत बांधकामावर व सबंधित अनधिकृत बांधकामास जबाबदार असणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याच्या अनुषंगाने महापौर, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका यांना पत्र दिले होते.
(४) भिवंडी (जि.ठाणे) शहरातील शांतीनगर भागातील नागांव-पिराणीपाडा येथे मौजे नागांव सर्व्हे क्रमांक ९८ / २० या भूखंडावरील जुना घर क्रमांक २४३१ या ठिकाणी तळ अधिक पाच मजल्याच्या अनधिकृत इमारतीस भिवंडी महानगरपालिकेमार्फत सन २०१३ मध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी अन्वये नोटीस बजाविण्यात आली असल्याचे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

दरम्यान सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक १०.०७.२०१९ रोजी दिलेल्या आदेशात बांधकाम धारकास रुपये १० लक्ष त्वरीत जमा करण्याचे आदेश देऊन सदरची अनधिकृत इमारत संपुर्णपणे निष्कासित करण्याबाबत आदेशीत केले होते. त्यानुसार भिवंडी महानगरपालिकेने निष्कासनाची कार्यवाही पुर्ण केली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पनवेल महानगरपालिकेत समाविष्ट करण्यात आलेल्या २३ ग्रामपंचायतीच्या कर्मचा-यांना महानगरपालिकेच्या सेवेत सामावून घेण्याबाबत**

**(५) २७७ (२०-०३-२०२०). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल महानगरपालिका (ता.पनवेल, जि.रायगड) स्थापन होवून अडीच वर्षाचा कालावधी होवूनसुद्धा पनवेल महानगरपालिकेमध्ये समाविष्ट झालेल्या २३ ग्रामपंचायतीच्या ३८४ कर्मचा-यांना अद्यापपर्यंत महानगरपालिकेच्या सेवेत समावेश करण्यात आले नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त २३ ग्रामपंचायतीतील कर्मचा-यांचे समावेशनाचे शासनाने निर्देश दिले असतानाही कर्मचा-यांना अद्यापपर्यंत महानगरपालिकेच्या सेवेत समाविष्ट करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून महानगरपालिकेत समाविष्ट करण्यात आलेल्या २३ ग्रामपंचायतीच्या ३८४ कर्मचा-यांना पनवेल महानगरपालिकेच्या सेवेत समावेशन करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-१०-२०२०) :** (१), (२) व (३) शासन अधिसूचना दिनांक २६.०९.२०१६ अन्वये दिनांक ०१.१०.२०१६ पासून नव्याने पनवेल महानगरपालिका स्थापन करण्यात आली आहे.

सदर महानगरपालिकेमध्ये समाविष्ट झालेल्या पूर्वीच्या २३ ग्रामपंचायतीच्या ३८४ कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेच्या सेवेत समाविष्ट करण्याच्या अनुषंगाने शासनाने दिनांक २७.०२.२०१७ च्या शासन निर्णयान्वये विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना केली.

सदर समितीने दिलेल्या अहवालाच्या अनुषंगाने दिनांक ०३.०६.२०१९ रोजी व दिनांक १९.०८.२०१९ तसेच दिनांक ३१.०८.२०२० रोजी आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांच्याकडून समावेशनासाठी पात्र असणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सविस्तर अहवाल प्राप्त करुन घेण्यात आला आहे.

सदर अहवालाची सखोल छाननी करुन पनवेल महानगरपालिकेच्या सेवेत पुर्वीच्या ग्रामपंचायतीमधील कर्मचाऱ्यांना समाविष्ट करण्यासाठी टप्पा निहाय प्रस्ताव तयार करण्यात आला असून सदर प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

## गोंदिया जिल्ह्यातील रस्त्यांच्या दूरवस्थेमुळे घडलेले अपघात

**(६) ३३५ (०२-०४-२०२०). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्यात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दुर्लक्षामुळे रस्त्यांची झालेली दूरव्यवस्था व त्यामुळे सन २०१९ यावर्षात २६२ अपघात झाल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्त्यावरील खड्डे व रस्त्याच्या कडेला वाढलेली झाडेझुडपे यामुळे अपघात होत असून सार्वजनिक बांधकाम विभाग गोंदिया यांनी रस्ता दुरुस्ती तसेच देखभालीकडे अक्षम्य दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागाने सदर प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून संबंधीत दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (१४-१०-२०२०) :** (१) हे खरे नाही.

सन २०१९ मधील २६२ रस्ते अपघातांपैकी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्यांवर एकूण ४४ अपघात घडल्याचे निदर्शनास आले आहे. तथापि पोलीस विभागाच्या अहवालानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्यावर झालेले अपघात हे चालकाच्या निष्काळजीपणामुळे, भरधाव वेगाने वाहन चालविल्यामुळे, मद्य प्राशनामुळे व इतर काही कारणांमुळे झालेले असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) हे खरे नाही.

सन २०१९ मध्ये गोंदिया जिल्ह्यात रस्ते देखभाल व दुरुस्तीची ६७ कामे करण्यात आली असून रस्ते खड्डे विरहित करून अपघात होऊ नये याची दक्षता घेण्यात आली आहे. तसेच मोटार परिवहन विभागाकडून प्राप्त झालेल्या सहा अपघात प्रवण स्थळावर आवश्यक सुधारणा करण्यात येऊन स्पिड ब्रेकर लावणे, थर्मोप्लॅस्टिक पेंट करणे, सुचना फलक लावणे इत्यादी कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पग्रस्तांच्या विविध मागण्यांबाबत

**(७) ४१५ (०६-०४-२०२०). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ बाधीत प्रकल्पग्रस्तांनी पुनर्वसना संदर्भातील आपल्या अनेक मागण्यांसाठी दिनांक २३ डिसेंबर, २०१९ रोजी पासून २३ दिवस सिडको भवन, बेलापूर

येथे आंदोलन केले असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, शुन्य पात्रता व अपात्र पद्धत बंद करून सरसकट सर्वांना पुनर्वसन पॅकेज लागू करावे, जोपर्यंत सिडको प्रकल्पग्रस्तांचे सर्व प्रश्न सोडवत नाही तोपर्यंत सिडको प्रकल्पग्रस्तांचे कोणतेही बांधकाम तोडू नये, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे बाधित झालेल्या मच्छीमार व्यावसायिकांना २०१ च्या कायद्याप्रमाणे नुकसान भरपाई द्यावी तसेच सन २०१४ मध्ये पॅकेजची पुस्तिका प्रकाशित केली आहे त्याप्रमाणे अंमलबजावणी व्हावी व सर्व युवक, युवतींना नोकरी उपलब्ध करून द्यावी, प्रकल्पग्रस्तांचे घर बांधून होईपर्यंत बाजारभावाप्रमाणे घरभाडे देण्यात यावे, अ, ब, क, ड घरांचे स्वतंत्र प्लॉट, घर भाडे निर्वाहभत्ता व कृषी मंजूरीचे स्वतंत्र कुटुंब म्हणून वाटप करावे, प्रकल्पग्रस्तांना वाढीव बांधकाम खर्च २५०० रूपये द्यावा अशा विविध मागण्या प्रकल्पग्रस्तांच्या प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ बाधीत प्रकल्पग्रस्तांच्या सदर मागण्या मान्य करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-१०-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनाबाबत शासन निर्णय, दि.०१.०३.२०१४ व दि.२८.०५.२०१४ अन्वये मंजूर केलेल्या पुनर्वसन पॅकेज नुसार देय लाभ अदा करण्यात आले असून सुमारे ९६ टक्के प्रकल्पबाधित स्थलांतरित करण्यात आलेले आहेत.

प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या सिडकोस प्राप्त झालेल्या आहेत. प्रकल्पग्रस्तांच्या सादर केलेल्या काही मागण्या ह्या उक्त पुनर्वसन पॅकेजबाहेरील असून त्यापैकी मच्छिमार बांधवांसाठी जेट्टी उभारणी तसेच मच्छीमार्केटसाठी भूखंड इ. मागण्या सकारात्मक दृष्टीकोनातून मान्य करुन त्याप्रमाणे सिडकोकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबई विभागातील होल्डिंग पॉंडस मधील गाळ काढण्याबाबत

**(८) ५३५ (२०-०३-२०२०). श्री.गणेश नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई शहरात खाडीचे पाणी शिरु नये यासाठी सिडकोने ठिकठिकाणी होल्डिंग पॉंडस बांधले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खारफुटी क्षेत्रापासून ५० मीटर लांब पर्यावरण विभागाच्या परवानगी शिवाय कोणत्याही स्वरूपाचे काम करण्यास बंदी घातल्याने तलाव स्वच्छ करता आलेले नाहीत त्यामुळे तलावांमध्ये गाळ साचून राहत असल्याने परिसरात दुर्गंधी पसरलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तलावांमधील गाळ काढण्यास परवानगी मिळावी म्हणून सिडको, केंद्र व राज्य शासनाकडे सातत्याने मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पुरापासून शहराचे संरक्षण व्हावे यासाठी तलावातील गाळ काढण्यास परवानगी मिळणेबाबत शासन स्तरावरून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-१०-२०२०) :** (१) व (२) हे खरे आहे.
सिडकोने नवी मुंबई क्षेत्रात एकूण ४४ होल्डींग पाँडस ची निर्मिती केली आहे.

पावसाचे पाणी हाय टाईडच्या वेळी होल्डींग पाँडस मध्ये साठवणे व लो टाईडच्या वेळी पाईप आऊटलेट द्वारे समुद्रात सोडण्यासाठी होल्डींग पाँडस ची निर्मिती केली आहे.
(३), (४) व (५) मा. उच्च न्यायालयाच्या दि.०६.१०.२००५ रोजीच्या आदेशानुसार मँग्रोज कांदळवन/खारफुटीची झाडे नष्ट करण्यास प्रतिबंध केल्यानंतर सिडकोने पायाभुत विकासकामे मुख्यत: होल्डींग पाँडस मधील गाळ काढण्याची परवानगी दिली व त्याच वेळी बी.ई.ए.जी. (बांम्बे एनव्हरायमेंटल ॲक्शन ग्रुप) च्या विरोधामुळे द्रोणागिरी नोडमध्ये परवानगी नाकारली.

सी.आर.झेड. क्षेत्रातील होल्डींग पाँडस मधील गाळ काढण्यासाठी पर्यावरण विभाग,केंद्र शासन व मा. न्यायालयाची परवानगी आवश्यक आहे. मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार यावर केंद्र शासनाने निर्णय घ्यायचा आहे. सदर प्रकरण तेथे प्रलंबित असल्याने सिडकोची दुरुस्तीची कामे थांबलेली आहेत.

---

## नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील ५२० भूखंड सिडकोकडून नवी मुंबई महानगरपालिकेला हस्तांतरित करण्याबाबत

**(९) ५९० (१६-०३-२०२०). श्री.गणेश नाईक (ऐरोली), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना शाळा, रुग्णालये, मैदाने, उद्याने, समाजमंदिर, व्यायामशाळा इत्यादी नागरी सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ५२० भूखंड नाममात्र दराने सिडकोकडून नवी मुंबई महानगरपालिकेला हस्तांतरित करून मिळावेत म्हणून महानगरपालिकेने सिडकोकडे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिडकोने अद्यापपर्यंत किती भूखंड नवी मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरित केले आहेत,
(३) असल्यास, उर्वरित भूखंड नाममात्र दराने कायमस्वरूपी हस्तांतरित करणेबाबत सिडकोच्या स्तरावरून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे व किती कालावधीमध्ये भूखंड हस्तांतरित करून मिळणे अपेक्षित आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-१०-२०२०) :** (१) ,(२) व (३) होय, हे अंशतः खरे आहे.

सिडकोने अद्यापपावेतो एकूण ५९७ भूखंड नवी मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरित केले आहेत.

तसेच २०२ भुखंडांचे भाडेपट्टा करारनामे नुतणीकरण प्रक्रियेमध्ये आहेत. त्यापैकी १४७ भुखंडांचे शुल्क भरणा पत्र महानगरपालिकेस दिले, असून त्यातील ७३ भुखंडांचा भाडेपट्टा करारनामे करण्यात आले आहेत. उर्वरित भुखंड हस्तांतरण प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईसह भिवंडी शहरात भटक्या कुत्र्यांचा होत असलेला उपद्रव

**(१०) ८६२ (०६-०४-२०२०). अॅड.राहुल नार्वेकर (कुलाबा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.अबू आजमी (मानखुर्द शिवाजीनगर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात भटक्या कुत्र्यांचा उपद्रव वाढला असून भिवंडी शहरातही अनेक भागांत शाळकरी मुलांना व नागरिकांना कुत्र्यांनी चावा घेऊन जखमी केल्याच्या गंभीर घटना माहे जानेवारी, २०२० च्या पहिल्या आठवड्यात वा त्या दरम्यान घडल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भिवंडी शहर आणि परिसरात पिसाळलेल्या कुत्र्यांनी अन्सार नगर, खंडूपाडा, पटेल नगर, परिसरात एकाच दिवशी १० मुलांचे लचके तोडले असल्याची घटना घडली असल्याचे दिनांक २ जानेवारी, २०२० रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ही सर्व मुले गंभीर जखमी झाली असून त्यांना नजीकच्या इंदिरा गांधी स्मृती रुग्णालयात दाखल करण्यात आले, त्यापैकी दोन मुलांच्या जखमा अतिगंभीर स्वरूपाच्या असल्याने त्यांना ठाणे व मुंबई येथील रुग्णालयात नेले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शहरात भटक्या कुत्र्यांची संख्या वाढली असून त्यांचा बंदोबस्त करण्यात यावा अशी मागणी वारंवार करून ही महानगरपालिका दुर्लक्ष करीत असल्याने नागरिकांमध्ये असंतोष पसरला असून पालक व मुलांमध्ये घबराट पसरली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर घटनेबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्या अनुषंगाने मोकाट कुत्र्यांचा लवकरात लवकर बंदोबस्त करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-१०-२०२०) :** (१) व (२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या श्वानदंश लसीकरण केंद्रात जानेवारी, २०२० मध्ये कुत्र्यांने चावा घेऊन जखमी केलेल्या २७७ घटनांची नोंद झालेली आहे.

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने कळविल्यानुसार माहे जानेवारी, २०२० च्या पहिल्या आठवड्यात भिवंडी शहरात भटक्या कुत्र्यांनी १०० च्या वर नागरिकांना चावा घेऊन जखमी केल्याच्या घटना घडल्या आहेत.

तथापि, महानगरपालिका स्तरावर प्राप्त झालेल्या तक्रारीनुसार शहरातील शाळकरी मुले व नागरीक यांचा भटक्या कुत्र्यांनी चावा घेतला ही वस्तुस्थिती आहे.

(३) भिवंडी येथील अंन्सार नगर येथे दिनांक २९.१२.२०१९ रोजी २ वर्षाच्या मुलीचा कुत्र्यांने चावा घेतल्याने त्यांच्यावर प्रथम जे.जे.रुग्णालय येथे उपचार करण्यात आले होते. तद्नंतर पुढील उपचाराकरीता नायर रुग्णालय येथे दाखल केले. सदर मुलीस योग्य उपचारानंतर सोडण्यात आले.

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्राबाहेरील खारबाव ग्रामीण परिसरात एक १२ वर्षीय मुलगा कुत्र्याच्या चाव्यात जखमी होऊन स्व.इंदिरा गांधी स्मृती रुग्णालय, भिवंडी येथे दाखल झाला होता. तथापी, सदर मुलास पुढील उपचारासाठी दिनांक ०५.०१.२०२० रोजी ठाणे / मुंबई येथे पाठविण्यात आले असल्याचे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(४) व (५) भिवंडी शहरातील भटक्या कुत्र्यांचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन महानगरपालिकेमार्फत खालील कार्यवाही करण्यात येत आहे:-

• भटक्या कुत्र्यांचे सर्वेक्षण माहे मार्च, २०१८ मध्ये हाती घेण्यात आले. त्यावेळी ४७५३ भटक्या कुत्र्यांची संख्या आढळून आली.

• तद्नंतर पुन्हा सर्वेक्षण सन २०१९ मध्ये करण्यात आलेल्या सर्वेक्षण अंती शहरात ८५१९ भटकी कुत्री आढळून आले.

• तसेच महानगरपालिकेने कुत्र्यांच्या निर्बीजीकरण व रेबिज प्रतिबंधक लस याकरीता माहे नोव्हेंबर, २०१८ पासून तीन वेळा निविदा मागविण्यात आल्या होत्या.

• तथापि, तीन वेळा निविदेस कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने चौथ्या वेळेस मागविलेल्या निविदेनुसार मे.युनिवर्सल ॲनिमल वेल्फेअर सोसायटी, हिंगोली, बीड यांची नेमणूक दिनांक २१.०१.२०२० च्या स्थायी समितीच्या मान्यतेने करण्यात आली आहे.

• त्यानुसार उपरोक्त संस्थेमार्फत पुढील कार्यवाही सुरू असल्याचे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे महानगरपालिका हद्दीतील क्रीडा संकुले खाजगी कंत्राटदारांना प्रायोगिक तत्वावर दिल्याबाबत**

**(११) १०३१ (२१-०३-२०२०). श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका हद्दीतील क्रीडा संकुले खाजगी कंत्राटदारांना प्रायोगिक तत्वावर देताना राजकीय पदाधिकारी व प्रशासकीय अधिकारी यांनी मर्जीतील ठेकेदाराला दिल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्या दरम्यानच्या कालावधीमध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या क्रीडा संकुलांच्या ऑनलाइन निविदा न मागविण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, ठाणे महानगरपालिका हद्दीतील क्रीडा संकुले प्रायोगिक तत्वावर देण्यात आल्याबाबतची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय निदर्शनास आले, त्यानूसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-१०-२०२०) :** (१), (२) व (३) ठाणे महानगरपालिका हद्दीतील ५ क्रिडा संकुलापैकी दादोजी कोंडदेव क्रिडा संकुल याचे व्यवस्थापन ठाणे महानगरपालिकेमार्फतच करण्यात येते. या व्यतिरीक्त ४ क्रिडा संकुले अनुक्रमे श्री. शरदचंद्रजी पवार मिनी क्रीडा संकुल, शहिद हेमंत करकरे मिनी क्रीडा संकुल, भारतरत्न सचिन तेंडूलकर मिनी क्रीडा संकुल, मौलाना अबुल कलाम आझाद क्रीडा संकुले येथे उत्तम दर्जाच्या प्रशिक्षण व्यवस्था नागरीकांना उपलब्ध करुन देण्याच्या हेतूने क्रिडा संकुले अभिव्यक्तीस स्वारस्य देकार (EXPRESSION OF INTERST) पध्दतीने खाजगी संस्थाना चालविण्यास ठाणे महानगरपालिकेच्या महासभेच्या दिनांक १९.०५.२०१८ रोजीच्या मंजुरीद्वारे देण्यात आली आहेत.

तथापि, क्रिडा संकुले अभिव्यक्तीस स्वारस्य देकार (EXPRESSION OF INTEREST) पध्दतीने देण्याकरीता ऑनलाईन जाहिरातीद्वारे देकार मागवून महत्तम देकार देणाऱ्या खाजगी संस्थेची निवड करुन प्रस्तावास स्थायी समितीने अंतिम मान्यता माहे नोव्हेंबर, २०१९ रोजी प्रदान केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धुळे महानगरपालिकेतील कचरा ठेकेदारी मध्ये झालेला गैरव्यवहार**

**(१२) ११४८ (०३-०४-२०२०). श्री.फारूक शाह (धुळे शहर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे महानगरपालिकेने धुळे शहर स्वच्छतेसाठी कच-याचा ठेका नाशिकच्या वॉटरग्रेस कंपनीला दिला असून ही कंपनी कामात दिरंगाई करीत असल्याने सदरहू कंपनीला कामात सुधारणा करण्याकरिता १५ दिवसाचा अवधी महानगरपालिकेने द्यावा तसेच १५ दिवसात या कंपनीच्या कामात सुधारणा न झाल्यास कंपनीला दंड आकारुन काळया यादीत टाकावे तसेच ज्या भागात स्वच्छता नसेल तेथील स्वच्छता निरीक्षकाला दंड करण्यात यावा अशी मागणी माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कच-याच्या ठेक्यामध्ये धुळे महानगरपालिकेतील अधिकारी यांची हिस्सेदारी असल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आले असुन याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-१०-२०२०) :** (१) होय.

सदर कंपनीच्या कामाबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीबाबत रु.२,९९,०००/- इतकी दंडात्मक कारवाई महानगरपालिकेने केली आहे. तसेच, सदर कंपनीस दि.१७/१२/२०१९ अन्वये कामात सुधारणा न झाल्यास काळ्या यादीमध्ये का टाकण्यात येऊ नये, अशी नोटीस देण्यात आली आहे.

कंपनीने महानगरपालिकेच्या इमारतीत तक्रार निवारण कैंद्र सुरु केले असून तक्रारींवर कार्यवाही केली जात आहे.

तसेच, महानगरपालिकेच्या स्वच्छता निरीक्षक यांच्यामार्फत कर्तव्य योग्य रितीने पार पाडले जात असून त्यांच्या कामात विशेष त्रुटी निदर्शनास न आल्याने त्यांना दंड करण्याचा प्रश्न उद्भवलेला नाही, असे धुळे महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) सदर कचऱ्याच्या ठेक्यामध्ये अधिकारी हिस्सेदार असल्याबाबत कोणतीही बाब निदर्शनास आलेली नाही, असे महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक महानगरपालिकेतील नवीन १४ हजार कर्मचारी पदांचा आकृतिबंध प्रस्तावाबाबत**

**(१३) १७६४ (०३-०४-२०२०). ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सद्यस्थितीत ७०८२ पदांचा आकृतिबंध मंजुर असुन त्यातील विविध संवर्गातील २०९६ पदे रिक्त आहेत, सद्यस्थितीत दिनांक ३१ मार्च, २०२० पर्यंत मोठ्या संख्येने अधिकारी व कर्मचारी पदे रिक्त होणार असल्याने महानगरपालिकेत रिक्त पदांची भरती प्रक्रिया करणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नाशिक महानगरपालिकेला 'ब' वर्ग दर्जा प्राप्त झाल्याने महानगरपालिका प्रशासनाने नवीन १४ हजार कर्मचारी पदांचा आकृतिबंध प्रस्ताव शासनाला सादर केला असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महानगरपालिका कार्यक्षेत्रात वाढत्या लोकसंख्येचा विचार करता नवीन कर्मचारी पदांचा आकृतिबंध तात्काळ मंजूर होणे अपेक्षित असताना मागील २ वर्षापासून शासन स्तरावर कर्मचारी आकृतीबंध प्रस्ताव मंजुरी अभावी प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अपूर्ण कर्मचारी वर्गामुळे महानगरपालिका कार्यक्षेत्रात नागरिकांसाठी पुरविल्या जाणाऱ्या मुलभूत सेवावर मोठ्या प्रमाणात परिणाम होऊन नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, नियोजित १४ हजार कर्मचारी पदांचा आकृतिबंध प्रस्ताव मंजुर करुन रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-१०-२०२०) :** (१) व (२) नाशिक महानगरपालिकेचा एकूण १४९४४ पदांचा आकृतीबंधाचा प्रस्ताव आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांनी दि.०४/०१/२०१७ अन्वये सादर केला आहे. यासंदर्भात आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांच्याकडून मागविण्यात आलेली माहिती दि.१३/०३/२०२० नुसार प्राप्त झाली आहे.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही.
(५) आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांच्या प्रस्तावाची छाननी करण्यात येत असून, पुढील कार्यवाही प्रस्तावित आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगांव महानगरपालिकेतील २३८७ गाळेधारकांवर अन्याय होत असल्याबाबत**

**(१४) १८७२ (०६-०४-२०२०). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव महानगरपालिकेत मागील कित्येक वर्षापासून गाळे २३८७ धारकांवर महानगरपालिका प्रशासनाने सुडबुद्धीने बजावलेली दंडात्मक देयके, लिलावाची प्रक्रिया व मालमत्तावरील बोजा लावण्याच्या घोषणांमुळे महानगरपालिका प्रशासन विरोधात गाळेधारकांनी प्राणांतिक उपोषण केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील ६ वर्षापासून भाडे व सर्व प्रकारच्या करांच्या रक्कमेचे धनादेश गाळेधारक दरवर्षी महानगरपालिकेला देत असुनसुद्धा महानगरपालिकेने ते स्विकारले नाही व गाळेधारकांना अनधिकृत ठरविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जळगांवच्या विकासात गाळेधारकांचे मोठे योगदान आहे, योग्य नुतनीकरणासह योग्य भाडे भरण्याचे सर्व गाळेधारक नेहमीच तयार आहेत परंतु अवास्तव भाडे, दंड घरांवर बोजा चढविणे व ई-लिलावाच्या माध्यमातून गाळेधारक उद्धवस्त करण्याचा प्रयत्न होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, महानगरपालिकेच्या २० व्यापारी संकुलातील २३८७ गाळेधारक व त्यांचे कुटुंबीय त्यांच्यावर अवलंबून असलेले कर्मचारी अशा ४० हजार नागरिकांचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनाने अधिसुचना प्रसिध्द केलेली असून दिनांक २७ मे, २०१९ रोजी शासन राजपत्रात प्रकाशित झालेले होते सदरील राजपत्र महाराष्ट्र महानगरपालिका ७९ “ड संदर्भात

प्रारूप नियमावलीत सूचना व हरकतीसाठी प्रकाशित केले होते तसेच सूचना व हरकतीसाठी नगर विकास विभाग व मा.मुख्यमंत्री यांच्याकडे लेखी निवेदन देऊनसुद्धा सुनावणीची संधी मिळाली नाही याबाबतचा कोणताही विचार न करता दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ रोजी वा त्या सुमारास अंतिम अधिसूचना प्रसिद्ध केली, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, ह्या अधिसूचनेत कलम ३ मधील पोट कलम २ अपेक्षित सुधारणा मालमत्तेच्या मूल्यांकनाच्या ८% रक्कम ऐवजी २% ते ४% निश्चित करण्यात यावे असे आयुक्तांना अधिकार देण्यात यावे व कलम ३ मधील पोट कलम ४ भाडे पट्ट्याचे नूतनीकरण हे किमान तीस वर्षासाठी असेल असे नमूद करण्यात यावे तसेच कलम ३ मधील पोटकलम ३ पैकी १ रद्द करून गाळे ज्यांच्या ताब्यात व महानगरपालिका दप्तरी ज्याचे नावाने नोंद असेल अशा गाळेधारकांना सरसकट नूतनीकरणाची परवानगी देण्यात यावी व कलम ३ मधील पोटकलम ३ पैकी ५ शिथिल करण्यात यावा असे नविन शुद्धिपत्रक काढून त्वरीत मानवतेच्या दृष्टीकोनातून गाळेधारकांच्या बाजुने न्याय देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-१०-२०२०) :** (१) जळगाव महानगरपालिकेच्या व्यापारी संकुलातील गाळयांची मुदत संपलेल्या काही व्यापाऱ्यांनी दि.२०/०३/२०१८ ते दि.२३/०३/२०१८ या कालावधीत उपोषण केले होते.

(२) अंशत: खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) महाराष्ट्र महानगरपालिका (स्थावर मालमत्ता भाडेपट्टा नुतनीकरण अथवा हस्तांतरण) नियम २०१९ हे प्रारुप नियम दि.२७/०५/२०१९ अन्वये प्रसिध्द केले होते. विहित तरतुदीनुसार सदर प्रारुप नियमाबाबत प्राप्त झालेल्या सुचना व हरकतींचा विचार करुन अंतिम अधिसूचना दि.१३/०९/२०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आली.

(६) नियमावलीतील तरतुदीनुसार, नुतनीकरणासाठी मालमत्तेच्या मुल्यांकनाच्या आठ टक्के किंवा बाजारभावाप्रमाणे निश्चित होणारे वार्षिक भाडे यापैकी जे जास्त असेल इतके भाडे मूल्यांकन समिती निश्चित करेल. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ (ड) मधील तरतूदीनुसार, महानगरपालिकांच्या मालमत्तांचे भाडे हे बाजारभावाशी सुसंगत असणे आवश्यक आहे. सर्वसाधारणत: राज्यातील महानगरपालिकात अशाच पध्दतीने भाडे आकारणी होती. जळगाव महापालिकेमध्ये सुध्दा अशाच दराने भाडे निश्चित करुन देयके दिली असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे. सबब, अधिनियमातील स्पष्ट तरतूद, महानगरपालिकातील प्रचलित भाडे आकारणी व महानगरपालिकांचे आर्थिक हित या बाबी विचारात घेऊन, सदर नियमावली व दरनिश्चिती करण्यात आली आहे. त्यामुळे याबाबत शुध्दीपत्रकाची आवश्यकता नाही.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

**अमरावती-परतवाडा या मार्गाचे चौपदरीकरण हे राज्य महामार्गाच्या दर्जानुसार विकसित करण्याबाबत**

**(१५) १९३६ (२०-०३-२०२०). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती-परतवाडा हा मार्ग मध्यप्रदेश, मेळघाटला जोडणारा व अत्यंत वर्दळीचा असल्याने या मार्गाचे चौपदरीकरण हे राज्य महामार्गाच्या दर्जानुसार विकसित करण्याची घोषणा केंद्रीय बांधकाम मंत्री व तत्कालीन मुख्यमंत्री यांनी काही महिन्यांपूर्वी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे नोव्हेंबर, २०१९ अखेरपर्यंत सदरील रस्त्याचे कामांबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात न आल्याने अपघाताच्या प्रमाणात मोठी वाढ होऊन अनेक नागरीकांचे नाहक बळी जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनस्तरावरुन सदरील मार्गाचे काम राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून गतिमान करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (१४-१०-२०२०) :** (१) विषयांकित रस्त्याचे चौपदरीकरण करण्याची घोषणा केंद्रीय बांधकाम मंत्री व तत्कालीन मुख्यमंत्री यांनी केल्याची कोणतीही माहिती या विभागाकडे उपलब्ध नाही.

(२) हे खरे नाही. सदर रस्त्याची द्विवार्षिक देखभाल दुरुस्ती अंतर्गत रस्त्यावरील खड्डे भरणे व इतर अनुषंगीक बाबीचे काम प्रगतीत असून, रस्ता वाहतूकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.

(३) विषयांकित रस्ता हा प्रमुख राज्यमार्ग दर्जाचा असल्याने राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून कार्यवाही करणेबाबत प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी महानगरपालिकेतील १०६ रोजंदारी कर्मचाऱ्यांना कायम करण्याबाबत**

**(१६) १९७१ (२१-०३-२०२०). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी महानगरपालिकेतील रिक्त जागांवर माहे मार्च, १९९३ पुर्वीपासून रोजंदारीवर कार्यरत असलेल्या १३६ रोजंदार कर्मचा-यांना कायम करण्यासंदर्भात महानगरपालिकेने नगरविकास विभागाकडे प्रस्ताव सादर केल्यानंतर त्यापैकी केवळ ३० कर्मचा-यांना कायम स्वरुपी नोकरीत सामावून घेण्यात आले असून उर्वरित १०६ कर्मचारी अद्यापही कायमस्वरुपी नोकरीपासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ५ फेब्रुवारी, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील नगरपरिषद व नगरपंचायतीतील २५०० रोजंदारी कर्मचाऱ्यांना कायम करण्यात आले असून त्याच पार्श्वभूमीवर परभणी महानगरपालिकेतील १०६ रोजंदारी कर्मचाऱ्यांना कायम करण्यात यावे अशी मागणी रोजंदारी कर्मचाऱ्यांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-१०-२०२०) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) • राज्यातील फक्त नगरपरिषद व नगरपंचायतीमधील रोजंदारी कर्मचाऱ्यांना सेवेत नियमित करण्याबाबतचा धोरणात्मक निर्णय शासनाने दि.५.२.२०१९ रोजी घेतलेला आहे.
• प्रस्तुत शासन निर्णयातील तरतूदी केवळ राज्यातील नगरपरिषदा/ नगरपंचायतीसाठी लागू करण्यात आलेल्या आहेत.
• त्यानुसार शासनाने दि.१०.२.२०२० रोजीच्या पत्रान्वये आयुक्त, परभणी महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी महानगरपालिकेने शहरात 'हॉकर्स झोन' तयार करण्याबाबत**

**(१७) १९७२ (२१-०३-२०२०). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मा.मुंबई उच्च न्यायालयाने राज्यातील सर्व महानगरपालिकांना 'हॉकर्स झोन' निर्माण करण्याचे आदेश देऊन तीन वर्षाचा कालावधी उलटून गेला तरीही परभणी महानगरपालिकेने अद्यापही शहरात 'हॉकर्स झोन' तयार केले नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिकेने 'हॉकर्स झोन' समिती तयार केली असल्याचे सांगण्यात येत असून सदर समिती ही केवळ कागदोपत्रीच असून शहरातील बाजारपेठेसह सर्व मुख्य रस्त्यांवर हातगाड्यांसह व्यावसायिकांनी अतिक्रमण केल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना त्याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय व न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या परभणी महानगरपालिकेतील संबंधित अधिका-यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-१०-२०२०) :** (१) परभणी शहरातील फेरीवाल्यांचे मोबाईल ॲप व बायोमॅट्रीक पध्दतीने सर्वेक्षण सुरु असून ते पूर्ण होताच शहरात हॉकर्स झोन तयार करण्यात येणार असल्याचे परभणी महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) व (३) महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागामार्फत मुख्य बाजारपेठ व रस्त्यावरील अतिक्रमण करणाऱ्या हातगाडी व व्यावसायिकांवर कार्यवाही करण्यात येत असून वेळोवेळी अतिक्रमण काढले जात आहे.

• शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार फेरीवाल्यांचे अंतिम टप्प्यातील सर्वेक्षण पूर्ण करुन फेरीवाला समितीच्या सूचनेनुसार शहरात फेरीवाला क्षेत्र तयार करण्यात येईल, असे परभणी महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे महानगरपालिकेने दिल्लीच्या धर्तीवर 'मोहल्ला' क्लिनिक योजना राबविल्याबाबत**

**(१८) ३२६४ (२१-०३-२०२०). अॅड.माणिकराव कोकाटे (सिन्नर), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिकेने दिल्लीच्या "मोहल्ला क्लिनिक योजनेच्या" धर्तीवर महानगरपालिका क्षेत्रात प्रायोगिक तत्वावर दोन ठिकाणी दवाखाने सुरु करुन त्यासाठी १६० रुपये कोटींचा प्रस्ताव देखील मंजूर केला असल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०२० रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दवाखान्याची अतिशय दयनिय अवस्था झाली असून तेथे औषधांचा तुटवडा असणे, ऑनलाईन कॉलिंग मशीन दोन महिन्यांपासून बंद असणे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नसणे तसेच डॉक्टर्स रुग्णांना बाहेरुन औषधे आणण्यास सांगत असल्याच्या रुग्णांच्या तक्रारी असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तसेच सदर योजना अधिक सक्षम होऊन त्यासाठी रुपये १६० कोटींची तरतूद फलदायी ठरु शकेल याबाबत आढावा घेण्यात आला आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-१०-२०२०) :** (१), (२) व (३) ठाणे महानगरपालिका क्षेत्रात "मोहल्ला क्लिनिक" योजनेच्या धर्तीवर प्रायोगिक तत्वावर ठाणे महानगरपालिकेने "आपला दवाखाना" नावाने दोन दवाखाने सुरू केले होते. ठाणे महानगरपालिकेने सदर दवाखाने माहे फेब्रुवारी, २०१९ ते एप्रिल, २०१९ दरम्यान विना तक्रारी चालविले होते.

ठाणे महानगरपालिकेने प्रायोगिक तत्वावर सुरू केलेल्या "आपला दवाखाना" योजनेस मिळालेल्या प्रचंड प्रतिसादाचा विचार करता, ठाणे महानगरपालिकेने सदर योजना ५० ठिकाणी सुरू करण्याचा निर्णय घेतला.

ठाणे महानगरपालिकेने "आपला दवाखाना" या योजनेसाठी रुपये १४४ कोटी ५९ लाख इतकी वित्तीय तरतुद केली आहे.

सदर योजनेचे दिनांक ०६.०२.२०२० रोजी उद्घाटन करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अहमदनगर महानगरपालिकेतील तांत्रिक पदे भरण्याबाबत

**(१९) ३६५८ (०५-०४-२०२०). श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर महानगरपालिकेत तांत्रिक १३३ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अहमदनगर महानगरपालिकेने जा क्र. १२७५ दिनांक ०९ जुलै, २०१९ रोजी वा त्या सुमारास पत्र देवून पदे भरण्याबाबत मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-१०-२०२०) :** (१) होय.

(२) होय.

अहमदनगर महानगरपालिकेतील एकूण १३३ तांत्रिक पदे भरण्यासाठी आस्थापना खर्चाची मर्यादा शिथील करण्याबाबत महानगरपालिकेने प्रस्ताव सादर केला आहे.

(३) महानगरपालिकेची मागील चार वर्षातील आस्थापना खर्चाची टक्केवारी पाहता, वर्ग-१ व वर्ग-२ या संवर्गातील अत्यावश्यक सेवेसाठीची पदे भरण्याकरीता महानगरपालिकेने उत्पन्न वाढीसाठी ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे. सबब, महानगरपालिकेचा आस्थापना खर्च विहित मर्यादेत आणण्याकरिता महानगरपालिकेने उत्पन्न वाढविण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याबाबत कार्यवाही करण्याचे दि.१८/०२/२०२० च्या पत्रान्वये महानगरपालिकेस कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील विकास कामांबाबत

**(२०) ३९९८ (०५-०४-२०२०). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हातील भिवंडी - निजामपूर शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात विविध विकास कामांसाठी केंद्र व राज्य शासनाकडून पाच वर्षात कोट्यवधींचा आर्थिक निधी उपलब्ध झालेला असूनही कोणतेही विकासकामे न करताच शासकीय निधीचा अपव्यय झाल्याची बाब दिनांक ३१ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेच्या कारभारामध्ये मोठ्या प्रमाणात झालेल्या गैरव्यवहाराबाबत शासनाने भिवंडी - निजामपूर महानगरपालिकेने केलेल्या विकास कामांची माहिती मागवावी व कॅगमार्फत विकास निधीची चौकशी करण्यात यावी अशी मागणी स्थानिक नागरिक, सेवाभावी संस्था व लोकप्रतिनिधी यांच्यामार्फत करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करून शासनातर्फे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-१०-२०२०) :** (१) भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेने शासनाच्या विहित निर्देशानुसार विकासकामे केली असल्याचे कळविले आहे.

सन २०१४-१५ ते सन २०१९-२० या कालावधीत ६ योजनेत केंद्र सरकारचा निधी रक्कम रु.४२५.९६ कोटी प्राप्त झालेला आहे. तसेच राज्य शासनाचा उपरोक्त कालावधीत ११ योजनांचा रु.१२१.२१ कोटी निधी प्राप्त झालेला असून त्यापैकी रुपये १०७.०६ कोटी खर्च झालेला आहे.

(२) व (३) भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेस सदर विषयाबाबत मोघम स्वरुपाच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.

भिवंडी निजापूर शहर महानगरपालिकेकडे कॅग ऑडीट करण्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. परंतु प्रधान महालेखाकार यांचेकडून महानगरपालिकेचे मार्च, २०१८ पर्यंत लेखापरिक्षण झाले आहे त्यामध्ये व्यपगत निधी व अपव्याबाबत कोणताही आक्षेप दिसुन येत नाही.

भिवंडी निजामपूर महानगरपालिकेने तांत्रिक लेखपरिक्षण अहवालानुसार अंतिम देयक अदा करण्याची कार्यवाही केली असल्याचे भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत अनधिकृत लेआऊटच्या जागेवर हार्डशिप कंम्पाऊंडीग अंतर्गत घरकुल नियमानुकूल करण्याचा प्रस्तावाबाबत

**(२१) ४३२२ (०५-०४-२०२०). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत अनधिकृत लेआऊटच्या जागेवर हार्डशिप कंम्पाऊंडीग अंतर्गत शासन घरकुल नियमानुकूल करण्याचा प्रस्ताव शासनाचे विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी अकोला महानगरपालिकेकडून २४७० घरकुलांचे प्रस्ताव निर्णयाअभावी प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी न्यायालयाचा स्थगन आदेश असल्याने घरकुल बांधकाम व अनुदान वितरण संदर्भात महानगरपालिकेस अडचणी निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासन स्तरावर कोणता निर्णय घेण्यात आला आहे व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-१०-२०२०) :** (१) असा कोणताही प्रस्ताव अकोला महानगरपालिकेकडून प्राप्त झालेला नाही.

(२), (३), (४) व (५) गुंठेवारी अधिनियमानुसार नियमानुकूल करण्यास अपात्र असलेले आणि हार्डशिप कंम्पाउंडीग अंतर्गत येत नसलेले २४७० घरकुलाचे प्रस्ताव अकोला महानगरपालिकेकडे

प्राप्त झाले असून, अशा प्रकरणात बांधकाम मंजुरी देता येत नसल्यामुळे, अनुदान वितरीत करता येत नाही, त्यामुळे सदरचे प्रस्ताव प्रलंबित असल्याचे, अकोला महानगरपालिकेच्या अहवालात नमूद आहे.

---

**परभणी महानगरपालिकेच्या जागेसंदर्भातील जुने दस्ताऐवज गहाळ झाल्याबाबत**

**(२२) ५०३६ (०५-०४-२०२०). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी महानगरपालिकेच्या जागेसंदर्भातील जुने अनेक महत्वपूर्ण दस्तऐवज गहाळ झाल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाडा मुक्तीसंग्रामानंतर बलदिया सरकारची जमीन संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना बहाल करण्याचे आदेश तत्कालीन शासनाकडून संपूर्ण मराठवाड्यात देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, परभणी महानगरपालिकेच्या जागेसंदर्भातील जुने दस्तऐवज गहाळ झाल्याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-१०-२०२०) :** (१) अनेक जुने महत्वपूर्ण दस्तऐवज गायब झाल्याची बाब माहे जानेवारी,२०२० मध्ये आढळून आलेली नाही व त्या कालावधीमध्ये कोणत्याही प्रकारचे अर्ज अथवा तक्रार प्राप्त झालेली नसल्याचे परभणी शहर महानगरपालिकेने कळविलेले आहे.

(२) मराठवाडा मुक्तीसंग्रामानंतर बलदिया सरकारची जमीन संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना बहाल करण्याचे कोणत्याही प्रकारचे आदेश महानगरपालिकेला प्राप्त झालेले नसल्याचे परभणी शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक महानगरपालिका हद्दीतील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुलातील ५३ एलईडी फ्लड फिटींग चोरी झाल्याबाबत**

**(२३) ५६५५ (०६-०४-२०२०). श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र. १७ मधील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुलातील सुमारे ३ लाख ७१ हजार रुपयाचे ५३ एलईडी फ्लड फिटींग गहाळ झाल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झालेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,चौकशीत काय आढळुन आले व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-१०-२०२०) :** (१) होय.

याबाबत उपनगर पोलिस स्टेशन, नाशिक येथे महानगरपालिकेमार्फत दि.२३/०१/२०२० रोजी तक्रार नोंदविण्यात आली आहे.
(२), (३) व (४) यासंदर्भात नाशिक महानगरपालिकेने व्दिसदस्यीय चौकशी समिती नेमली आहे. चौकशी समितीचा अंतिम अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील योग्य ती कार्यवाही करण्याचे महानगरपालिकेमार्फत प्रस्तावित आहे.

---

## वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या (जि.पालघर) वृक्ष प्राधिकरण आणि दिवाबत्ती विभागाचे लाखो रुपयांचे साहित्य विनावापर पडून असल्याबाबत

**(२४) ६०४५ (०६-०४-२०२०). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या (जि.पालघर) वृक्ष प्राधिकरण आणि दिवाबत्ती विभागाचे लाखो रुपयांचे साहित्य पेल्हार येथील जलशुद्धीकरण केंद्राच्या आवारात विनावापर पडून असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या निष्काळजीपणामुळे लाखो रुपयांचा आर्थिक फटका बसल्याप्रकरणी हलगर्जीपणा करणाऱ्या जबाबदार अधिकारी/कर्मचा-यांवर कारवाई करण्याची मागणी वसई तालुक्यातील श्री.अशोक गजानन शेळके या एका राजकीय पक्षाच्या स्थानिक पदाधिका-याने दिनांक ०६ जानेवारी, २०२० रोजी वा त्या सुमारास एका सविस्तर लेखी निवेदनाद्वारे मा.मुख्यमंत्री महोदय यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने सदर प्रकरणी चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-१०-२०२०) :** (१) हे खरे नाही.

तथापि, महानगरपालिकेने कळविल्यानुसार पेल्हार येथील जलशुध्दीकरण केंद्राच्या आवारात प्रभाग समिती-एफ (पेल्हार) विद्युत विभागाचे बंदीस्त वर्कशॉप व गोडाऊन असून तेथे त्याच प्रभाग समितीतील सार्वजनिक दिवाबत्ती व्यवस्थेची दैनंदिन दुरुस्ती/ आवश्यक विद्युत साहित्यांचा साठा ठेवण्यात येतो. तसेच या आवारात प्रभागातील पुनर्वापर करण्यात येणाऱ्या वृक्षप्राधिकरणाच्या ट्री-गार्ड चा साठा देखील करण्यात येतो, ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) अशा प्रकारची तक्रार शासनाकडे प्राप्त झाली असून सदर तक्रारीच्या अनुषंगाने तात्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात बेकायदेशिररीत्या मांस विक्री होत असल्याबाबत**

**(२५) ६०४६ (०६-०४-२०२०). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात हजारो मांस विक्रेते बेकायदेशीररीत्या मांस विक्री करत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मांस विक्री करीत असताना त्याच्या गुणवत्तेबाबत आणि स्वच्छतेबाबत शासकीय निकष डावलून शासनाने आखून दिलेल्या अटी व शर्तींचे सर्रासपणे उल्लघंन करणाऱ्या अनधिकृत मांस विक्रेत्यांवर कारवाई करण्याची मागणी वसई तालुक्यातील श्री.अशोक गजानन शेळके या एका राजकीय पक्षाच्या स्थानिक पदाधिकाऱ्याने दिनांक ०६ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास एका सविस्तर लेखी निवेदनाद्वारे मा.मुख्यमंत्री महोदयांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणत्या स्वरुपाची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-१०-२०२०) :** (१) वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात स्वच्छता अभियानात कचरा विलगीकरणाची प्रक्रिया सुटसूटीत करणे अंतर्गत महानगरपालिकेने शहर क्षेत्रात बोकड/कोंबडी मांस विक्री करणाऱ्या केंद्रांचे सर्वेक्षण माहे डिसेंबर, २०१९ पासून सुरु केले आहे. सदर सर्वेक्षणात अंदाजित ६१५ अनधिकृत विक्रेते निदर्शनास आले आहेत.

सदर अनधिकृत मांस विक्रेत्यांवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३८२, ३८६ अन्वये कारवाई सुरु केली आहे. सदर अनधिकृत विक्रेत्यांवर महानगरपालिकेने दंड ठोठावणे, उघड्यावरील मांसाची विल्हेवाट लावणे याबाबत नोटीसा दिल्या असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) व (३) अनधिकृत मांस विक्रेत्यांवर कारवाई करण्याची तक्रार शासनाकडे प्राप्त झाली आहे. महानगरपालिका क्षेत्रात मांस विक्री करताना शासनाने मांस विक्रीच्या अनुषंगाने विहित केलेले गुणवत्तेचे व स्वच्छतेचे सर्व निकष पालन करण्याच्या अनुषंगाने आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यास महानगरपालिकेस सूचित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वसई-विरार उपविभागाचा सर्वांगिण विकास करण्याबाबत

**(२६) ६०८२ (०६-०४-२०२०). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश पाटील (बोईसर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार उप विभागाचा सर्वांगिण विकास करण्यासाठी जपान इंटरनॅशनल को. ऑपरेशन एजन्सी (जेआयसीए) कडुन दीर्घमुदतीचे कर्ज घेण्याचा प्रस्ताव वसई-विरार महानगरपालिकेच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विचाराधीन प्रस्तावावर महानगरपालिकेने कोणता निर्णय घेतला आहे व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-१०-२०२०) :** (१) व (२) वसई-विरार उप प्रदेशात सर्व समावेशक पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी बृहत आराखडा जपान इंटरनॅशनल को. ऑपरेशन एजन्सी (जेआयसीए) या संस्थेमार्फत त्यांच्या खर्चाने तयार करण्यास व कर्ज निधी उपलब्ध करुन देण्याच्या प्रस्तावास वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सर्व साधारण सभेत सन २०१४ मध्ये मंजुरी दिली आहे ही वस्तुस्थिती आहे.

तथापि, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०९ अन्वये सदर प्रस्ताव शासनास सादर झाला असता सद्यस्थितीत वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात सुरू असलेल्या जल वाहतुक प्रकल्प, बुलेट ट्रेन प्रकल्प, नविन पाणी पुरवठा योजना इत्यादीची कामे सुरू असताना जपान इंटरनॅशनल को. ऑपरेशन एजन्सी (जेआयसीए) अर्थ सहाय्यक पुर्व अभ्यासांची आवश्यकतेबाबत सविस्तर अहवाल सादर करण्याच्या सूचना यापूर्वीच वसई विरार शहर महानगरपालिका यांना देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रात खेळांच्या मैदानासाठी आरक्षित असलेल्या जागांवर मोठ्या प्रमाणावर अतिक्रमणे झाली असल्याबाबत

**(२७) ६१९१ (०५-०४-२०२०). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रात वसई विभागामध्ये ५०.६९ टक्के, नालासोपारा विभागामध्ये ७७.३७ टक्के तर विरार विभागामध्ये ३०.४५ टक्के खेळांच्या मैदानासाठी राखीव असलेल्या भूखंडावर अनधिकृत इमारती आणि अतिक्रमणे झाली असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० च्या पहिल्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राखीव भूखंडावर झालेल्या बांधकामांवर महानगरपालिकेचे अधिकारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करित असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्या अनुषंगाने राखीव भूखंडावर झालेली अनधिकृत बांधकामे तात्काळ निष्कासित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-१०-२०२०) :** (१) व (२) वसई विरार शहर महानगरपालिकेच्या अहवालानुसार दिनांक १५.०३.२००७ रोजी मंजुर झालेला प्रारुप विकास आराखड्यानुसार सद्यस्थितीत मैदानासाठी राखीव भूखंडाची आरक्षणे एकूण १३८ आहेत. तथापि, मैदानासाठी आरक्षित असलेल्या ३७ भूखंडावर अतिक्रमणे / अनधिकृत बांधकामे आहेत ही वस्तुस्थिती आहे. त्यापैकी ३४ भुखंडावरील अतिक्रमणे / अनधिकृत बांधकामे ही महानगरपालिकेस नियोजन प्राधीकरणाचे अधिकार प्राप्त होण्यापूर्वीची आहेत.

उपरोक्तपैकी २९ अतिक्रमणे हटवून भूखंड महानगरपालिकेने ताब्यात घेतली आहेत. एकूण ५ भूखंड मैदान विकसीत करण्यात आली असून ३ भुखंडावरील अतिक्रमणे हटविण्याची कार्यवाही महानगरपालिका स्तरावर सुरू असल्याचे कळविले आहे. तर २४ आरक्षित भूखंडावर मैदाने विकसीत करण्यात येत आहेत.
(३) उक्त प्रश्नाच्या अनुषंगाने मंजुर विकास आराखडा, आरक्षण व विकास यातील तरतुदीनुसार शहर हद्दीतील आरक्षीत भूखंडावर अतिक्रमणे / अनधिकृत बांधकामांवर आवश्यक ती नियमोचीत कार्यवाही करण्याच्या सूचना आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गिरणी कामगारांच्या घरांसाठी काढलेल्या लॉटरीला स्थगिती देण्यात आल्याबाबत**

**(२८) ८९७१ (२८-०५-२०२०). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मा.मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत गिरणी कामगारांच्या ३८९४ घरांसाठी दिनांक १ मार्च, २०२० रोजी वा त्यासुमारास काढण्यात आलेल्या लॉटरीला मा.उच्च न्यायालयाच्या नियंत्रण समितीने स्थगिती दिल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समितीच्या नियमांचे म्हाडा व शासनाकडून पालन न झाल्यामुळे गिरणी कामगारांचे घराचे स्वप्न लांबणीवर पडले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, समितीच्या कोणत्या नियमांचा भंग झाल्यामुळे सदर स्थगिती देण्यात आली आहे,
(४) असल्यास, सदर स्थगिती उठविण्यात येऊन गिरणी कामगारांना घरांचे वाटप लवकरात लवकर होण्याच्या दृष्टीने म्हाडा व शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जितेंद्र आव्हाड (०९-१०-२०२०) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**औरंगाबाद शहरात कोरोना पॉझिटिव्ह रुग्णांची संख्या वाढत असल्याबाबत**

**(२९) ९२४१ (२८-०५-२०२०). श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद शहरात कोरोना पॉझिटिव्ह रुग्णांची संख्या झपाट्याने वाढत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिकेच्या आरोग्य विभागात कोणतेही प्रशिक्षण न घेतलेल्या अधिकारी व कर्मचारी यांना रुग्ण शोधण्याचे काम देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महानगरपालिकेच्या कामावर प्रश्नचिन्ह उभे राहत असून शहरात वाढणाऱ्या कोरोना रुग्णांची संख्या लपविण्याचा प्रकार सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी करुन जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-१०-२०२०) :** (१) हे खरे आहे.
(२) कोरोना बाधित रुग्ण शोध मोहिमेकरिता नियुक्त केलेले सर्व अधिकारी, कर्मचारी, आशा वर्कस व आंगणवाडी कर्मचारी शिक्षकवर्गाला औरंगाबाद महानगरपालिकेने प्रशिक्षण दिलेले असून, वेळोवेळी शासनाकडून प्राप्त होणाऱ्या सूचनांनुसार कार्यवाही करण्याबाबत सर्व अधिकारी/ कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेने अवगत केले आहे, ही वस्तुस्थिती आहे.
(३) औरंगाबाद शहरातील कोरोना आजाराची लागण झालेल्या रुग्णाचे पॉझिटिव्ह रिपोर्ट प्राप्त झाल्यानंतर त्याबाबतचा अहवाल शासनास नियमित पाठविण्यात येतो.

- तसेच कोरोनाग्रस्त रुग्णांची माहिती शासनाच्या पोर्टलवर नियमित भरण्यात येत असून, रुग्ण संख्येबाबतची माहिती लपविण्यात आली नसल्याबाबत औरंगाबाद महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे महानगरपालिकेने माजिवडा भागातील ग्लोबल इम्पॅक्ट हब येथे उभारलेल्या कोविड रुग्णालयात वैद्यकीय अधिकाऱ्यांची व परिचारिकांची संख्या वाढविण्याबाबत**

**(३०) ११४२२ (१०-०७-२०२०). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिकेने शहरातील विकासकांच्या मदतीने माजिवडा भागातील ग्लोबल इम्पॅक्ट हब येथे तात्पुरत्या स्वरूपात एक हजार खाटांचे कोविड रुग्णालय उभारले असून या रुग्णालयात ५०० खाटा विनाऑक्सिजन आणि ५०० खाटा ऑक्सिजनच्या पुरवठ्यासह उपलब्ध असून १०० खाटांचा अतिदक्षता विभाग, डायलिसिस सेंटर, तपासणी प्रयोगशाळा अशा अद्ययावत सुविधा उपलब्ध असलेले रुग्णालय दिनांक १८ जून, २०२० रोजी वा त्या सुमारास लोकार्पण करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रुग्णालयात सुमारे १०० वैद्यकीय अधिकारी आणि ३५० परिचारिकांची आवश्यकता असतानाही केवळ ११ वैद्यकीय अधिकारी आणि ४७ परिचारिका सद्यस्थितीत कार्यरत असल्याने केवळ ४० करोना बाधित रुग्ण दाखल करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची आणि परिचारिकांची संख्या वाढवून सदरहू रुग्णालय तातडीने पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्याबाबत शासनाकडून अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-१०-२०२०) :** (१), (२) व (३) ठाणे महानगरपालिकेने माजीवाडा भागातील ग्लोबल इम्पॅक्ट हब येथे दिनांक १८ जून, २०२० रोजी कोवीड - १९ रुग्णालयाचे लोकार्पण केले आहे.

सदर रुग्णालयात सद्यस्थितीत १५५ परिचारीका व प्रसविका कार्यरत आहेत. तसेच ६८ वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत. त्याचप्रमाणे या ठिकाणी इतर आवश्यक कर्मचारी देखील कार्यरत आहेत. सदर रुग्णालयात जुलै, २०२० अखेर पर्यंत ४३३ रुग्ण दाखल होते.

ठाणे महानगरपालिकेच्या कार्मिक विभागाअंतर्गत वैद्यकीय अधिकारी व परिचारिका यांची तात्पुरत्या स्वरूपात भरती करण्यात येणार असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक (ओझर) विमानतळाचे नामकरण स्व.यशवंतराव चव्हाण विमानतळ असे करण्याबाबत**

**(३१) ११४२७ (१७-०९-२०२०). श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक (ओझर) येथे मिग विमान कारखाना हा महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या प्रयत्नाने सुरु झाला त्यामुळे त्यांच्या या कार्याचा गौरव म्हणून नाशिक विमानतळास स्व.यशवंतराव चव्हाण विमानतळ असे नामकरण करण्यात यावे अशा प्रकारची मागणी मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे मार्च, २०२० मध्ये वा त्या दरम्यान शासनाकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक विमानतळाचे स्व.यशवंतराव चव्हाण विमानतळ असे नामकरण करण्याबाबत शासनाने काय निर्णय घेतला आहे व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे (१५-१०-२०२०) :** (१) होय.

(२) ही बाब राज्य शासनाच्या अधिकार कक्षेत येत नसल्याने त्याबाबत हिंदुस्तान एरॉनॉटिक्स लिमिटेड (HAL) कडून अभिप्राय मागविण्यात आले आहेत. त्यांनी सदर प्रकरणी केंद्र शासनाच्या संरक्षण मंत्रालयाशी संपर्क करण्याचे अभिप्राय दिले असून त्यानुसार प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर (जि.चंद्रपूर) शहरातील नागरिकांना नियमीत पाणी पुरवठा होत नसल्याबाबत**

**(३२) ११५८९ (१७-०९-२०२०). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर (जि.चंद्रपूर) शहरातील नागरिक महानगरपालिकेला पाणी कर अदा करत असतांनाही त्यांना नियमीत पाणी पूरवठा होत नसल्याने नागरिकांची पाण्यासाठी पायपीठ होत असल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरातील पाणी पूरवठा तातडीने सुरळीत करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी आयुक्त, महानगरपालिका यांच्याकडे दिनांक १९ मे, २०२० रोजी वा त्या सुमारास झालेल्या बैठकीत केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व सदर मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-१०-२०२०) :** (१) व (२) स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १९/०५/२०२० रोजीच्या बैठकीत, शहराच्या कांही भागात अनियमितपणे होणाऱ्या पाणीपुरवठ्याकडे लक्ष वेधले होते, हे खरे आहे.

(३) व (४) चंद्रपूर शहराची पाणीपुरवठा योजना सन १९७६-७७ मधील असून, ती अतिशय जुनी आहे. यात आवश्यकतेप्रमाणे पाणीवितरण व्यवस्था नाही, ही वस्तुस्थिती आहे.

चंद्रपूर शहराला सद्य:स्थितीत धरण आणि नदीतील पाण्याद्वारे एकूण ४० एम.एल.डी. इतका पाणीपुरवठा होत असून, शहरात ज्या भागात पाण्याची पाईपलाईन नाही, अशा भागात २८ कुपनलिका व ७२० हातपंप व ८ टँकरद्वारे जवळपास १.०० एम.एल.डी. पाणीपुरवठा केला जातो.

चालू वर्षात उन्हाळ्याच्या कालावधीत शहरात पाणीपुरवठा सुरळीत रहावा यासाठी, महापालिकेने, टिलु पंप जप्त करणे, ज्या ठिकाणी पाईपलाईन नाही, अशा भागात १४५ प्लास्टीकच्या पाण्याच्या टाक्या लावल्या आहेत.

शहराचे वाढते नागरिकीकरण आणि जुनाट पाणीपुरवठा योजना या पार्श्वभूमीवर, शहरासाठी "अमृत योजनेमधून" पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेची आवश्यक कामे सुरु आहेत. आतापर्यंत योजनेच्या उद्दिष्टाच्या ७४ टक्के इतकी कामे पूर्ण झाली असून, मार्च, २०२१ पर्यंत सदरहू योजनेतील सर्व कामे पूर्ण करण्याचा कालावधी निश्चीत करण्यात आलेला आहे.

---

## जिंतूर-येलदरी (ता.जिंतूर, जि.परभणी) रस्त्यावरील साखरतळा ते भगवानबाबा नगर पर्यंतच्या जुन्या रस्त्यावर डांबरीकरण न करता कच टाकण्यात आल्याबाबत

**(३३) ११६४१ (१७-०९-२०२०). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) जिंतूर (जि.परभणी) तालुक्यातील जिंतूर-येलदरी रस्त्यावरील साखरतळा ते भगवानबाबा नगर पर्यंतच्या ४ कि.मी.जुन्या रस्त्यावर डांबरीकरण न करता कच टाकण्यात आले असल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिंतूर येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनागोंदी कारभारामुळे सदर रस्त्यावर कच टाकण्यामागच्या कारणाचे स्पष्टीकरणही विभागाकडून मिळत नसल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले व तद्नुसार दोषींवर कारवाई करून सदर रस्त्याचे काम दर्जेदार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (१४-१०-२०२०) :** (१) हे खरे नाही.

सदर रस्त्यावरील साखरतळा ते भगवानबाबा नगर काम जिंतूर शहरात येत असून कि.मी. ६९/६०० ते ७०/७०० या साखळी क्रमांकाअंतर्गत असून प्रश्नात नमूद ४.०० कि.मी.ऐवजी प्रत्यक्षात एकूण लांबी १.१० कि.मी. आहे. प्रश्नाधीन रस्त्यावर साखरतळा ते भगवानबाबा नगरपर्यंतच्या साखळी क्र. ६९/६०० ते ७०/७०० या १.१० कि.मी. लांबीपैकी ७०/२०० ते ७०/७०० ह्या ०.५० कि.मी. लांबीत अंदाजपत्रकीय तरतुदीनुसार डांबरीकरण करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

स्पष्टीकरण मागविण्यात आल्याचे आढळून आलेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगोरत्थान या अभियानांतर्गत जळगाव शहरातील मुलभूत सोयीसुविधांसाठी रू १०० कोटी निधी मंजूर करण्यात आल्याबाबत

**(३४) ११७४९ (१७-०९-२०२०). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगोरत्थान या अभियानांतर्गत जळगाव शहरातील मुलभूत सोयीसुविधांसाठी रू १०० कोटी निधी मंजूर करण्यात आला असून त्यास स्थगिती देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधीतून ४२ कोटी रुपयांचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला असून त्यास प्रशासकीय मान्यता मिळाली असून त्या कामाची निविदा प्रक्रिया काढण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-१०-२०२०) :** (१) • महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत जळगाव शहरासाठी मुलभूत सोयी सुविधांसाठी असणाऱ्या प्रकल्पांकरिता अंदाजित रु. १०० कोटीच्या प्रस्तावास तत्वतः मान्यता देण्यात आली होती.

• तद्नंतर महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत जळगाव शहराच्या रु. ४१.९५ कोटी किंमतीच्या रस्ते विकास प्रकल्पास दिनांक ०१.०८.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

• नगर विकास विभागांतर्गत विविध विकास कामांच्या प्रकल्पांना दिनांक ०५.१२.२०१९ पर्यंत कार्यादेश देण्यात आलेले नाहीत अशा प्रकल्पांना दिनांक ०५.१२.२०१९ रोजीच्या पत्रान्वये स्थगिती देण्यात आलेली होती.

• मात्र दिनांक ३१.०३.२०२० रोजीच्या पत्रान्वये सदर स्थगिती उठविण्यात आलेली आहे.

(२), (३) व (४) • महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत जळगाव शहराच्या रु. ४१.९५ कोटी किंमतीच्या रस्ते विकास प्रकल्पास दिनांक ०१.०८.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

• सदर प्रकल्पाची कार्यान्वयन यंत्रणा सार्वजनिक बांधकाम विभाग आहे.

• सदर प्रकल्पाची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून निविदा स्वीकृती प्रस्ताव मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांच्याकडून शासन स्तरावर सार्वजनिक बांधकाम विभागाकडे मंजूरीसाठी पाठविण्यात आला आहे.

• वित्त विभागाच्या दिनांक ४ मे, २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये कोविड-१९ या संसर्गजन्य रोगामुळे उद्भवलेल्या अर्थव्यवस्थेवरील परिणामामुळे पुढील आदेशापर्यंत कार्यादेश देऊ नयेत अशा सूचना सर्व विभागांना देण्यात आलेल्या आहेत.

---

**कशेळी (जि.ठाणे) परिसरातील एका गरोदर महिलेला दुसऱ्या महिलेचा रिपोर्ट देण्यात आल्याबाबत**

**(३५) ११८०० (१७-०९-२०२०). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कशेळी (जि.ठाणे) परिसरातील एका ९ महिन्याच्या गरोदर महिलेला ठाणे महानगरपालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय आणि सिविल हॉस्पिटलच्या चुकीमुळे मनस्ताप सहन करावा लागला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गरोदर महिलेचा रिपोर्ट न देता आडनाव समान असल्याने दुसऱ्या महिलेचा रिपोर्ट देण्यात आल्याने हा झालेला प्रकार अतिशय गंभीर असून या प्रकरणी दोषी असलेल्यांवर कारवाई करण्याची मागणी नातेवाइकांकडून करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीनुसार महानगरपालिका प्रशासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनूसार कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-१०-२०२०) :** (१), (२) व (३) ठाणे महानगरपालिकेच्या अहवालावरुन नाम साधर्म्यामुळे महिला रुग्णाचा अहवाल दुसऱ्या महिलेस देण्यात आल्याची बाब सकृतदर्शनी निदर्शनास येते.

सदर प्रकारच्या घटना भविष्यात घडु नये याबाबत आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना शासन पत्राव्दारे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच तद्नुषंगाने सार्वजनिक आरोग्य विभाग यांना त्यांच्या अधिनस्त असणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यास कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी महानगरपालिका (जि.ठाणे) क्षेत्रातील नाले व गटार सफाईत झालेला गैरव्यवहार**

**(३६) ११८८७ (१०-०७-२०२०). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी शहर (जि.ठाणे) परिसरात पावसाचे पाणी साचू नये याकरिता महानगरपालिका प्रशासनाने शहरातील १ ते ५ प्रभाग कार्यक्षेत्रातील गटार व नालेसफाई करण्यासाठी जवळपास १ कोटी ५८ लाख ३२ हजार ५४३ रूपयांचा ठेका विविध खाजगी ठेकेदार कंपनींना दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू ठेकेदार कंपन्यांनी कोणत्याच प्रकारची नाले व गटार सफाई न करता महानगरपालिकेचे बांधकाम अधिकारी, आरोग्य विभाग अधिकारी व प्रभाग अधिकाऱ्यांच्या संगनमताने ही सफाई केवळ कागदोपत्री दाखवून ठेक्याची देयके सादर केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहरातील नाल्यांची व गटारांची योग्य ती सफाई न झाल्याने माहे जुन, २०२० मध्ये झालेल्या पहिल्याच पावसात तीनबत्ती, पद्मानगर, दरगाह रोड, शांतीनगर अशा विविध भागात मोठ्या प्रमाणात पाणी साचून पूरजन्य परिस्थिती निर्माण होवून नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महानगरपालिकेने शहरातील नाले व गटारांची सफाई करण्याचे किती रक्कमांचे ठेके कोणकोणत्या ठेकेदारांना दिले होते व त्यापैकी सदरहू कंत्राटदारांना किती रक्कम अदा करण्यात आली आहे,

(५) असल्यास, कोणतीही नालेसफाई व गटारांची सफाई न करता देयके सादर करणाऱ्या आणि जनतेची व शासनाची फसवणूक करणाऱ्या ठेकेदारांवर फौजदारी कारवाई करावी व त्यांना काळ्या यादीत टाकावे असे आदेश महानगरपालिका आयुक्तांनी माहे जून, २०२० मध्ये वा त्या दरम्यान दिले होते, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, त्यानुषंगाने या प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली व त्याचा तपशील काय आहे, तसेच सदरहू कार्यवाही केव्हापर्यंत करण्यात येणार आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-१०-२०२०) :** (१) भिवंडी निजामपूर शहर महानगर पालिकेच्या कार्यक्षेत्रातील नाले सफाई करुन घेणेकामी बांधकाम विभागाकडून रुपये १,५७,३३,१६१/- चा ठेका देण्यात आला आहे.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने गटार सफाईची कामे ठेका पध्दतीने न देता थेट मजूर मेहनताना तत्वावर देण्यात येतात.

सदर गटार सफाई कामासाठी रुपये ४१,८१,४००/- रक्कमेची आर्थिक तरतूद भिवंडी-निजामपूर शहर महानरपालिकेने केली आहे.

(२) हे खरे नाही.

तथापि, गटार सफाईच्या झालेल्या कामांची देयके सादर केल्याची बाब भिवंडी निजामपूर महानगरपालिकेने कळविली आहे.

(३) भिवंडी शहरात माहे जून, २०२० चा पहिल्या पावसात कोठेही मोठ्या प्रमाणांवर पाणी संचय होवून पूरजन्य परिस्थिती निर्माण झालेली नसून नागरीकांना कोणत्याही अडचणीचा सामना करावा लागलेला नाही. तसेच पूरजन्य परिस्थिती उद्भवल्यास महानगरपालिकेमार्फत तातडीने उपाययोजना करण्यात येत असल्याचे भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) अ) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्रातील बांधकाम विभागाकडील नालेसफाईचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.:

| प्र.स.क्र. | बांधकाम विभागाकडील नालेसफाई ठेकेदाराचे नांव व पत्ता | ठेका रक्कम | अदा केलेली देयक रक्कम |
|---|---|---|---|
| १ | मे.झा.पी.ॲण्ड कं. उल्हासनगर | ३५,२१,३३८/ | -- |
| २ | मे.बुबेरे ॲण्ड असो.भिवंडी | ३४,९१,९५८/- | -- |
| ३ | मे.सागर कन्स्ट. भिवंडी | २४,४८,००४/- | -- |
| ४ | मे.बुबेरे ॲण्ड असो.भिवंडी | ३१,९६,६९३/- | -- |
| ५ | मे.सागर कन्स्ट. भिवंडी | ३०,७५,१६८/- | -- |
| एकूण रक्कम रु. | | १,५७,३३,१६१/- | -- |

कोणत्याही ठेकेदार/कंपनीस आजतागायत नाले सफाईबाबतच्या कामाचे देयक अदा करण्यात आलेले नाही.

ब) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्रातील गटार सफाईचा तपशील खालीलप्रमाणे आहे :

सदर गटर सफाईची कामे ही ठेका पध्दतीने करण्यात येत नाही. तथापि, प्रभाग स्तरावर आवश्यकतेनुसार थेट मजूर मेहनताना तत्वावर पावसाळापुर्वी गटार सफाई केली जाते.

| प्रभाग समिती क्र. | मंजुर अंदाजपत्रकीय रक्कम | लेखा विभागाकडे सादर केलेली देयके |
|---|---|---|
| १ | ९,०९,०००/- | ६,८१,१४४/- |
| २ | ९,०९,०००/- | ७,५६,८९४/- |
| ३ | ९,०९,०००/- | ८,०४,१६२/- |
| ४ | ७,२७,२००/- | ६,९२,६५८/- |
| ५ | ७,२७,२००/- | ४,९६,९२०/- |
| एकूण रक्कम | ४१,८१,०००/- | ३४,३१,७७८/- |

गटार सफाईचे कामाकरीता रुपये ४१,८१,८०० इतकी अंदाजपत्रकीय रक्कम मंजूर करण्यात आली होती. सदर मंजुर रक्कमेपैकी रुपये ३४,३१,७७८/- ची देयके लेखा विभागाकडे सादर करण्यात आली आहे. तसेच मजुर मेहनताना तत्वावर उपलब्ध काम करुन झालेल्या मजूरांना द्यावयाच्या रक्कमेपैकी रुपये २४,५४,३००/- एवढी रक्कम अग्रीम म्हणून देण्यात आलेली आहे.

(५) हे खरे नाही.
(६) व (७) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**श्री साईबाबा संस्थान शिर्डी (ता.राहाता, जि.अहमदनगर) येथील मयत कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना अनुकंपातत्वावर नियुक्ती देण्याबाबत**

**(३७) १२३३१ (१९-०९-२०२०). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्री.साईबाबा संस्थान शिर्डी (ता.राहाता, जि.अहमदनगर) येथे सेवेमध्ये असताना मयत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या मुलांना अनुकंपा तत्वावर संस्थानच्या सेवेत सामावून घेण्याबाबतचा प्रस्ताव संस्थान व्यवस्थापनाने माहे ऑगस्ट, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान पाठविला असता, सदर प्रस्तावात शासनाने काही त्रुटी काढल्या असून सदर त्रुटीची पूर्तता करुन सुधारीत प्रस्ताव माहे डिसेंबर, २०१९ मध्ये व दिनांक ८ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास सादर करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी तेथील लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री तसेच सचिव, विधी व न्याय विभाग यांच्याकडे दिनांक ५ मार्च, २०२० रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊन प्रस्तावास मान्यता देण्याबाबत विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रस्तावावर निर्णय घेण्यास विलंब होत असल्यामुळे मयत कर्मचाऱ्यांच्या पाल्यांची उपासमार होत असल्याने सदर प्रस्तावास मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे (०५-१०-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) विधि व न्याय विभाग, शासन निर्णय क्रमांक सासंवि१०१९/८१३/प्र.क्र.१५३/कार्या.१६, दिनांक २७/८/२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये श्री साईबाबा संस्थान, शिर्डी येथील अधिकारी/कर्मचा-यांच्या वारसांसाठी अनुकंपा तत्वावर नियुक्ती बाबतच्या नियमावलीस मान्यता देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अहमदनगर शहरातील मंजूर असलेली नगरोत्थान योजनेतील रस्त्यांची कामे पूर्ण करण्याबाबत**

**(३८) १२३३३ (२०-०९-२०२०). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर शहरातील तारकपूर ते सर्जेपुरा, एसटी वर्कशॉप व उपनगरातील टीव्ही सेंटर ते भिस्तबाग महल पर्यंत मंजूर असलेली नगरोत्थान योजनेतील व्याजाच्या रक्कमेतून प्रस्तावित असलेली कोट्यवधी रुपयांची रस्त्याची कामे कार्यारंभ आदेश देऊनही प्रलंबित असल्याची बाब माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामे लवकरात लवकर न केल्यास या कामासाठीचा निधी परत जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, टीव्ही सेंटर येथे कामासाठी रस्त्यावरील पाण्याच्या वाहिन्या हटविण्यासाठी अंदाजपत्रकात तरतूद नसल्याने ही कामे कशी करावयाची असा प्रश्न निर्माण झाला असून, रस्ता खोदून ठेवल्याने लोकांच्या व व्यावसायीकांच्या मार्गात अडथळा निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार सदरची रस्त्यांची कामे पूर्ण करण्याच्या दृष्टीने तसेच त्यासाठीचा निधी परत जाऊ नये याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-१०-२०२०) :** (१) उपरोक्त नमूद भागातील काही ठिकाणच्या रस्त्याबाबत मा. न्यायालयात दावे प्रलंबित आहेत व काही ठिकाणच्या जलवाहिन्या स्थलांतरीत करावयाच्या कामाची निविदा प्रसिध्द केली आहे. उर्वरीत ठिकाणचे काम प्रगतीपथावर आहे.
(२) महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियान (राज्यस्तर व जिल्हास्तर) या अभियानांतर्गत मिळालेले अनुदान बँकेत ठेवल्यामुळे अहमदनगर महापालिकेस मिळालेल्या व्याजाच्या रकमेतून ही कामे मंजूर केलेली आहेत. सन २०१५-१६ ते २०१८-१९ दरम्यान वितरीत केलेला निधी खर्च करण्यास दिनांक ३१.०३.२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे सद्यस्थितीत निधी परत जाण्याची शक्यता नाही.
(३), (४) व (५) टीव्ही सेंटर येथील काही ठिकाणी रस्त्यावरील पाण्याच्या वाहिन्या हटविण्यासाठी अहमदनगर महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात “वाढीव हद्दीत पाईपलाईन टाकणे” या लेखाशीर्षाखालील तरतूदीमधून काम करण्यासाठी निविदा मागविण्यात आली आहे व व्यावसायिकांच्या दुकानांसमोर मुरुम टाकून येण्याजाण्याचा अडथळा दूर केला आहे.

---

## पनवेल महानगरपालिकेच्या शाळांचे ISO मानांकन रद्द झाल्याबाबत

**(३९) १२४३७ (१९-०९-२०२०). श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी), श्री.राजकुमार पटेल (मेळघाट), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल महानगरपालिकेच्या शाळांचे ISO मानांकन रद्द झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळांचे मानांकन रद्द होण्यामागची कारणे काय आहेत, तसेच मुदत संपूनही दर्जा न राखल्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनूसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-१०-२०२०) :** (१) व (२) पनवेल महानगरपालिकेच्या ११ प्राथमिक शाळा आहेत. सदर प्राथमिक शाळेचे खाजगी संस्थेकडून बहिस्थ यंत्रणेमार्फत ISO मानांकन गुणवत्ता मुल्यमापन करण्यात आले आहे.

सदर मुल्यमापन करणाऱ्या संस्थेकडून ११ प्राथमिक शाळांपैकी ९ प्राथमिक शाळांना ISO मानांकन प्रमाणपत्र दिनांक १४.०८.२०१८ रोजी प्राप्त झाले आहे.

सदर शाळांचे गुणवत्ता मुल्यमापन ऑगस्ट, २०२० मध्ये करण्याचे नियोजन होते. तथापि, कोवीड साथीच्या प्रादुर्भावामुळे शाळा बंद असल्याने सदर शाळांचे ISO मानांकन गुणवत्ता मुल्यमापन करणे शक्य झाले नाही. तथापि, महानगरपालिकेच्या शाळा सुरु झाल्यानंतर सदर शाळांचे मुल्यमापन करणार असल्याची बाब पनवेल महानगरपालिकेने कळवली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदेड जिल्हातील,बिलोली - कोंडलवाडी धर्माबाद कि.मी. २९/४०० ते ४३/००० या महत्वपूर्ण रस्त्याच्या कामाबाबत

**(४०) १२६१८ (१७-०७-२०२०). डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्हातील, बिलोली-कोंडलवाडी-धर्माबाद कि.मी. २९/४०० ते ४३/००० या (दोन राज्यांना जोडणाऱ्या) महत्वपूर्ण रस्त्याचे काम केंद्रीय मार्ग निधी अंतर्गत माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान पूर्ण झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या १३ कि.मी. लांबीच्या कामांसाठी केंद्रीय मार्ग निधी (सी.आर.एफ.) अंतर्गत प्रति कि.मी.१ कोटी रुपयेप्रमाणे १३ कोटी रुपये खर्च करण्यात आले व या कामाचे कंत्राटदार मे.जी.जी.कंस्ट्रक्शन करखेली हे होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मे.जी.जी. कंस्ट्रक्शन या कंत्राटदाराने सदरचे काम अतिशय निकृष्ठ दर्जाचे केल्यामुळे अल्पावधीतच या कामाची दुरवस्था झाली परंतु बांधकाम विभागाने दोषदायित्व कालावधीत (डी.एल.पी.) संबंधीत कंत्राटदाराकडून हे काम पून्हा करून घेणे अपेक्षित असतांना अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही केल्याचे निदर्शनास आले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, संबंधीत कंत्राटदाराच्या विरोधात यापुर्वी सुध्दा अशा प्रकारच्या अनेक तक्रारी विभागाकडे प्राप्त झाल्या आहेत तसेच वर्तमानपत्रात अनेक बातम्या / स्थानिकांच्या अनेक तक्रारी होऊनसुध्दा कार्यकारी अभियंता/अधिक्षक अभियंता वा तत्सम अधिकारी या प्रकरणात दुर्लक्ष करीत असुन सदर कंत्राटदाराशी हितसंबंध जोपासून त्यास पाठीशी घालण्याचा प्रयत्न करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले व त्यानुषंगाने संबंधीत कंत्राटदारावर व दोषी अधिका-यांवर कारवाई करण्याबाबत तसेच दोषदायित्व कालावधी संपण्यापुर्वी रस्त्याची पूनर्बांधणी त्याच कंत्राटदाराकडून करून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (१४-१०-२०२०) :** (१) होय. हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.

एकूण १४.०० कि.मी. मंजूर लांबीपैकी अन्य योजनेतून काम झाल्यामुळे, तसेच दोष निवारण कालावधीतील लांबी असल्यामुळे ८.८०० कि.मी. लांबी वगळण्यात आली व उर्वरीत ५.२०० कि.मी. लांबीत प्रत्यक्षात काम जी जी कन्स्ट्रक्शन्स, करखेली यांच्याकडून करण्यात आले आहे.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही.
(५) प्रश्नाधीन काम गुणवत्तापूर्ण असल्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तसेच, दोषदायित्व कालावधीत कंत्राटदाराकडून खड्डे भरून घेण्यात आले आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिडको मधील कर्मचाऱ्यांनी सोसायटी स्थापन करण्यासाठी मिळालेल्या भूखंडाचा गैरवापर केल्याबाबत**

**(४१) १२६८२ (१६-०७-२०२०). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिडकोमधील तीस कर्मचारी एकत्रित येऊन मे. स्नेहपुष्प को. ऑ. हौ. सोसायटी स्थापन करून या संस्थेच्या माध्यमातून सिडकोकडे भूखंडासाठी अर्ज करून नेरळ सेक्टर ४० येथील ९ व १० क्रमांकाचा भूखंड केवळ निवासी वापरासाठी देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रत्यक्षात हा भूखंड विकासकाला देण्यासाठी बनावट कागदपत्रे तयार करून ती सिडकोकडे सादर करून व त्याची कल्पना तत्कालीन सिडको अधिकारी यांना असतानाही त्याकडे दुर्लक्ष करून भूखंडाचे वाटप केले असून त्यामध्ये प्रास्तावित गृहनिर्माण सोसायटीमध्ये पदाधिकारी व कर्मचारी यांचा समावेश असून केवळ सिडको कर्मचारी यांच्यासाठी ही गृहनिर्माण सोसायटी बनवली असतानाही त्यामध्ये विकासकाला सभासद म्हणून घेण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर भूखंड मंजूर केल्यानंतर भरावयाची रुपये ७३ लक्ष रक्कम देखील विकासकाने सिडकोला भरली होती त्याकरिता बनावट कागदपत्रे सिडकोला सादर केले होते त्याद्वारे भूखंडाचा पूर्णपणे ताबा नियमबाह्य पद्धतीने खाजगी विकासकाला देण्यात आला व त्यावर वाणिज्य व निवासी वापराचे बांधकाम उभारले असताना सिडको अधिकाऱ्यांनी उक्त प्रकरणी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-१०-२०२०) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

सिडकोच्या ३२ कर्मचा-यांकरिता नेरुळ येथील सेक्टर-४० मधील भूखंड क्र.९ व १० हा मे. स्नेहपुष्प को. ऑ.हौ. सोसायटीला दि. २०.०५.१९९४ रोजी इरादापत्र देण्यात आला आहे. सदर संस्थेने रु.७३.७९ लाख रुपयांचा भरणा केल्यानंतर उक्त भूखंडांचा दि.१८.०२.२००२ रोजी भाडेपट्टा करारनामा करण्यात आला आहे.

तथापि, तत्कालीन वसाहत विभागातील कर्मचारी/अधिका-यांनी सिडको कर्मचारी नसलेल्या बाह्य त्रयस्थ व्यक्ती श्री.हरिश नागजी छेडा यांना सोसायटीचे अतिरिक्त सभासद केले. तद्नंतर सदर भुखंड विकासक मे. शहा ऍण्ड छेडा होम्स प्रा. लि. यांना हस्तांतरित करण्यात आला. उक्त भूखंड हे निव्वळ निवासी प्रयोजनाकरिता वाटप केलेला असतांना सदर भूखंडावरील चटईक्षेत्र वाढवून सदर भुखंडांचा निवासी ऐवजी निवासी व वाणिज्य असा वापर मंजूर करण्यात आला आहे.
(४) सिडकोच्या दक्षता विभागाने चौकशीअंती दोषी सिडको कर्मचारी आणि विकासाविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्याची शिफारस केल्यानंतर सी.बी.डी. बेलापुर पोलिस स्टेशन येथे सी.आर. क्र.५० अन्वये फौजदारी गुन्हा दि.११.०३.२०२० रोजी दाखल करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे येथे उच्च न्यायालयाचे फिरते खंडपीठ होणेबाबत

**(४२) १२७२५ (१९-०९-२०२०). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुण्यात फिरते खंडपीठ व्हावे अशी मागणी पुणे शहरातील वकिलांसह मा.लोकप्रतिनिधींनी माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उच्च न्यायालयाचे खंडपीठ पुण्यात स्थापन करण्याच्या ठरावास ४२ वर्ष होऊनही त्यावर अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे (०७-१०-२०२०) :** (१). होय.
(२) व (३). राज्यात उच्च न्यायालयाचे कायमस्वरुपी खंडपीठ स्थापन करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनास मान्यतेसाठी पाठविण्यापूर्वी त्यास राज्य पुर्नरचना अधिनियम, १९५६ च्या कलम ५१ (२) नुसार उच्च न्यायालयाचे मा.मुख्य न्यायमूर्ती यांची सहमती आवश्यक आहे.

राज्य मंत्रिमंडळाच्या दि.१२/०५/२०१५ रोजीच्या बैठकीत कोल्हापूर येथे मा.उच्च न्यायालयाचे फिरते खंडपीठ स्थापन करण्यास मान्यता देण्यात यावी तसेच पुणे येथेही मुंबई उच्च न्यायालयाचे फिरते खंडपीठ (सर्किट बेंच) स्थापन करण्याबाबत सकारात्मक विचार करण्यात यावा, असी शिफारस मा. मुख्य न्यायमुर्ती, उच्च न्यायालय, मुंबई यांना करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याप्रमाणे शासनाने दि.१७/०७/२०१५ रोजीच्या पत्रान्वये शिफारस केली आहे. सदर शिफारशीचा सकारात्मक विचार करण्याची फेरविनंतीही दि. २८/०२/२०१८ रोजीच्या शासन पत्रान्वये मा.मुख्य न्यायमुर्ती यांना करण्यात आली आहे. सदर प्रकरणी त्वरित निर्णय होण्याकरिता शासन पत्र, दि.१९/०१/२०१९ अन्वये याबाबत बैठक आयोजित करण्याबाबत मा.मुख्य न्यायमुर्ती, मुंबई उच्च न्यायालय यांना विनंती करण्यात आली असून शासन पत्र, विधि व न्याय विभाग, दि.१९/०३/२०२० अन्वये सदर विनंतीकडे उच्च न्यायालय प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक शहरातील धोकादायक पुलांच्या पुनर्बांधणीबाबत

**(४३) १२७३५ (०६-०८-२०२०). श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक मधील नागरिकांसाठी धोकादायक ठरणा-या पुलांच्या पुनर्बांधणीची तसेच नदीपात्रात अडथळे निर्माण करणारी बांधकामे हटविण्याची मागणी मा. स्थानिक लोकप्रतिनीधी यांनी निवेदनाव्दारे माहे ऑगस्ट, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान आयुक्त, महानगरपालिका यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नाशिक शहरातील रामसेतू, मिलींदनगर पुल, दोंदे पुल, संभाजी चौक येथील पुल, फॉरेस्ट नर्सरी पुल, आसाराम बापु पूल आणि घारपुरे घाटावरील सिध्देश्वर मंदिर येथील पुलांच्या पुनर्बांधणीसह गोदावरी नदीपात्रातील बंधारे आणि बांधकामे कशा पध्दतीने चुकीची झालेली आहेत याबाबत मेरी आणि केंद्रीय जलसंपत्ती नियामक प्राधिकरण यांनी महानगरपालिकेला अहवाल सादर केलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणी महानगरपालिका प्रशासनाकडून या पुलांच्या पुनर्बांधणीबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे तसेच धोकादायक पुलांच्या पुनर्बांधणीकरिता शासनस्तरावरुन निधी उपलब्ध करुन दिला जाणार आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०९-२०२०) :** (१) होय.
(२) हे खरे नाही.

केंद्रीय जल व विद्युत संशोधन संस्था, पुणे यांनी नाशिक शहरातील गोदावरी व नंदिनी नदीच्या संभाव्य पुर पातळीचा अभ्यास करुन अहवाल महानगरपालिकेस सादर केला आहे. यामध्ये महत्वाचे मुद्दे खालीलप्रमाणे आहेत.

• संस्थेच्या अनुमानानुसार २५ वर्ष व १०० वर्ष वारंवारीतेसाठी काढण्यात आलेल्या महत्तम पुर पातळी ही लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाने प्राप्त केलेल्या पातळीशी मिळत्याजुळत्या आहेत.

• गोदावरी व नंदिनी नदीपात्रात अस्तित्वातील सर्व बांधकामे असतांना,

• २५ वर्ष वारंवारीतेच्या पुराच्या महत्तम पुर पातळीत अनुक्रमे ३.४० व १.४५ मी. इतकी वाढ होते.

• १०० वर्ष वारंवारीतेच्या पुराच्या महत्तम पुर पातळीत अनुक्रमे ४.२० व १.६३ मी. इतकी वाढ होते.

• नदीचा प्रवाह सुरळीत होण्याच्या अनुषंगाने नदीपात्राच्या तळातील गाळ काढुन प्रवाह क्षमता वाढविणे व नदीपात्रातील जुनी बांधकामे जसे की बंधारे काढल्यानंतर,

• २५ वर्ष वारंवारीतेच्या पुराच्या महत्तम पुर पातळीत अनुक्रमे ३.३० व १.८६ मी. इतकी घट होते.

• १०० वर्ष वारंवारीतेच्या पुराच्या महत्तम पुर पातळीत अनुक्रमे ३.८३ व २.२१ मी. इतकी घट होते.

(३) नाशिक महानगरपालिकेने नंदिनी व गोदावरी नदीची पुरपातळी कमी होण्याच्या दृष्टीने खालील प्रमाणे उपायोजना केल्या असल्याचे कळविले आहे.

• नंदिनी नदीवरील ०३ जुने ब्रिटीशकालीन खुले बंधारे काढण्यात आले आहेत.

• गोदावरी नदीवरील होळकर पुल ते फोरेष्ट नर्सरी पुल या ३.२ कि.मी. भागातील नदीपात्रातील गाळ काढण्याच्या कामाचा कार्यारंभ आदेश देण्यात आलेला आहे.

• होळकर पुलाखालील बंधारा काढून त्या ठिकाणी यांत्रिक पध्दतीचे Automated Baloon Gates बसविण्याच्या कामाचा कार्यारंभ आदेश देण्यात आलेला आहे.

• पुराच्या प्रवाहास अडथळा ठरणारे काँक्रीटीकरण निर्मुलन करुन नदीपात्र विस्तीर्ण करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

• नाशिक शहराच्या सन २०१७ मध्ये मंजुर झालेल्या विकास आराखड्यामध्ये निरीच्या शिफारशीनुसार निळी व लाल पुररेषा क्षेत्रामधील विकास परवानगी देणेबाबत प्रतिबंधित क्षेत्रात बांधकामे निर्बंधीत करण्यात आलेली आहेत व मर्यादीत क्षेत्रात अटी शर्तीसह नियंत्रित करण्यात आलेले आहे.

• सद्यस्थितीत अस्तित्वातील जुने पुल काढण्याबाबत कोणताही निर्णय झालेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद (जि.औरंगाबाद) शहरातील जैविक कचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्याबाबत**

**(४४) १२७७० (२०-०९-२०२०). श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद (जि.औरंगाबाद) शहरातील जैविक कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी महानगरपालिकेने वॉटरग्रेस या कंपनीची नियुक्ती केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहरात जागोजागी जैविक कचरा आढळून येत असून नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले व तद्नुसार सदर कंपनीवर कारवाई करण्याबाबत व कचऱ्याची विल्हेवाट लावण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-१०-२०२०) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) औरंगाबाद शहरात जागोजागी जैविक कचरा आढळून येत असल्याबाबतची कोणतीही लेखी तक्रार महानगरपालिकेकडे प्राप्त झालेली नाही.
• मे.वॉटर ग्रेस प्रॉडक्ट्स या कंपनीमार्फत शहरातील जैविक कचरा गोळा करणे व त्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्याची कार्यवाही करण्यात येत असल्याचे महानगरपालिकेने कळविलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद (जि.औरंगाबाद) शहरातील कॅनॉट भागात विदुयत पथदिव्यांवर केबलचे जाळे विखुरलेले असल्याबाबत

**(४५) १२७७२ (२०-०९-२०२०). श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद (जि.औरंगाबाद) शहरातील कॅनॉट भागात विदुयत पथदिव्यांवर केबलचे जाळे विखुरलेले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी महानगरपालिकेच्या अतिक्रमण हटाव पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी १००% केबल काढल्याचा अहवाल सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार केबल न काढताच १००% केबल काढल्याचा अहवाल देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-१०-२०२०) :** (१), (२) व (३) औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील विद्युत पोलवरील इंटरनेट, केबल टि.व्ही.इ.बाबत अनधिकृतपणे टाकण्यात आलेले केबल काढून टाकण्याबाबत श्री.मुकेश भट यांनी मा.उच्च न्यायालय औरंगाबाद येथे जनहित याचिका दाखल केली होती.

• सदर जनहित याचिकेमधील मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार शहरातील विद्युत पोलवरील अनधिकृतपणे टाकलेली सर्व केबल महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाकडून काढून टाकण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

• ज्यावेळी औरंगाबाद शहरातील विद्युत पोलवरील अनधिकृत केबल काढून टाकण्याची कार्यवाही महानगरपालिकेकडून केली जाते, त्यावेळी त्याबाबतचा अहवाल मा.उच्च न्यायालयास सादर करण्यात येत असल्याचे औरंगाबाद महानगरपालिकेने कळविलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद (जि.औरंगाबाद) महानगरपालिका क्षेत्रातील अनेक शाळा व ज्ञानमंदिरे खाजगी संस्थांना भाडे तत्वावर देण्यात आल्याबाबत**

**(४६) १२८०३ (२०-०९-२०२०). श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद (जि.औरंगाबाद) महानगरपालिका क्षेत्रातील अनेक शाळा व ज्ञानमंदिरे खाजगी संस्थांना भाडेतत्वावर देण्यात आले असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जागा अत्यंत कमी भाडेतत्वावर व मोठ्या कालावधीसाठी खाजगी संस्थांना देण्यात आल्यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-१०-२०२०) :** (१) व (२) हे खरे आहे.

• औरंगाबाद महानगरपालिकेच्या चार शालेय इमारती भाडे तत्वावर देण्यासाठी सन २०१५-१६ मध्ये निविदा मागविण्यात आल्या होत्या.

• महानगरपालिकेच्या चार शालेय इमारतीपैकी एक इमारत निविदा प्रक्रिया राबवून निविदेच्या उच्च दराने मासिक भाडे रु.१,२९,०००/- प्रमाणे तीन वर्षासाठी भाडे तत्वावर देण्यात आली. ही वस्तुस्थिती आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद (जि.औरंगाबाद) येथील सिद्धार्थ उद्यानातील प्राणिसंग्रहालयाची मान्यता रद्द होण्याच्या मार्गावर असल्याबाबत**

**(४७) १२८११ (२०-०९-२०२०). श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद (जि.औरंगाबाद) येथील सिद्धार्थ उद्यानातील प्राणिसंग्रहालयातील प्राण्यांना पोषक वातावरण तयार करण्यासाठी प्राणिसंग्रहालय प्राधिकरणाने काही दुरुस्त्या सुचवून त्या पूर्ण करण्यासाठी १ वर्षाची मुदत दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास प्राणिसंग्रहालय प्राधिकरणाने दिलेल्या १ वर्षाच्या मुदतीमध्ये कामे पूर्ण झाली नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कामे पूर्ण न झाल्याने सिद्धार्थ उद्यानातील प्राणिसंग्रहालयाची मान्यता रद्द होण्याच्या मार्गावर आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार औरंगाबाद येथील सिद्धार्थ उद्यानातील प्राणिसंग्रहालयाची मान्यता रद्द होऊ न देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-१०-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) औरंगाबाद प्राणिसंग्रहालयाची काही कामे पूर्ण झालेली असून काही कामे प्रगती पथावर आहेत. सदर कामे लवकरच पूर्ण करण्यात येतील, असे औरंगाबाद महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) व (४) प्राणिसंग्रहालय प्राधिकरण, नवी दिल्ली यांनी सुचविलेली कामे सुरु असून प्राणिसंग्रहालयाचे मूल्यमापन करण्यासाठी व परवाना नूतनीकरणासाठी केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्याकडे औरंगाबाद महानगरपालिकेने प्रस्ताव सादर केलेला आहे.

• प्राणिसंग्रहालयाची परवानगी रद्द होणार नाही यासाठी महानगरपालिका प्रयत्नशील असल्याचे औरंगाबाद महानगरपालिकेने कळविलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भिवंडी (जि.ठाणे) येथील धोकादायक इमारतीबांबत

**(४८) १३३१९ (१६-०७-२०२०). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) येथे ७१८ मोडकळीस आलेल्या इमारती तर २१० अतिधोकादायक इमारती असल्याने या इमारतींमध्ये राहणाऱ्या हजारो नागरिकांचा जीव धोक्यात आल्याचे दिनांक २० जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भिवंडी मधील प्रभाग एक मध्ये ३६, प्रभाग दोन मध्ये १५९, प्रभाग तीन मध्ये २०८, प्रभाग चारमध्ये २७८ तर प्रभाग पाच मध्ये २२१ इमारती मोडकळीस आल्या असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनातर्फे चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती उपययोजना करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-१०-२०२०) :** (१) भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात सद्यस्थितीत एकूण १०३ इमारती अतिधोकादायक व ३०७ इमारती धोकादायक श्रेणीत असल्याची वस्तुस्थिती भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेनी कळविली आहे.

(२) भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका यांनी कळविल्यानुसार महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मोडकळीस आलेले इमारतींची संख्यानिहाय तपशिल खालीलप्रमाणे आहे:-

| प्रभाग समिती | अतिधोकादायक | धोकादायक |
|---|---|---|
| १ | ७ | ११ |
| २ | ९ | १५० |
| ३ | १० | ९८ |
| ४ | १५ | २३ |
| ५ | ६२ | २५ |

(३) महानगरपालिका क्षेत्रातील मोडकळीस आलेल्या इमारतींवर कार्यवाही करण्यासाठी शासनाने दिनांक ०५.११.२०१५ च्या परिपत्रकान्वये कार्यपध्दती निश्चित केली आहे.

तथापि, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका क्षेत्रातील अतिधोकादायक व धोकादायक इमारतींना नोटीसा बजाविण्यात आल्या आहेत. त्यानुसार सध्यस्थिती खालील प्रमाणे आहे.

- निष्कासित इमारती-५
- वीज पुरवठा खंडीत इमारती-२५
- इमारतींचे दुरूस्तीचे काम सुरू-२
- इमारती निर्मनुष्य - १५
- न्यायप्रविष्ठ प्रकरणे- ३२
- इतर इमारतीच्या कार्यवाहीबाबतची प्रकरणे महानगरपालिका स्तरावर प्रलंबित आहेत.

आपात्कालीन परिस्थितीत मोडकळीस आलेल्या इमारतीमधील रहिवाशांना महानगरपालिकेचे सांस्कृतीक केंद्र, रात्रनिवारा केंद्र व महानगरपालिकेच्या शाळेत तात्पुरत्या स्वरुपात स्थलांतरीत करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर महानगरपालिकेतील यांत्रीकी व पाणी पुरवठा विभागातील कंत्राटी कर्मचा-यांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन व भत्ते प्रदान करण्याबाबत**

**(४९) १३८८६ (१९-०९-२०२०). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर महानगरपालिकेतील यांत्रीकी व पाणी पुरवठा विभागातील कंत्राटी कर्मचा-यांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन व भत्ते प्रदान करण्याबाबत मा. वि.स.स. बल्लारपूर यांनी आयुक्त, महानगरपालिका, चंद्रपूर यांना दिनांक ९ जुलै, २०२० रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनूसार सदर कंत्राटी कर्मचा-यांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन व भत्ते प्रदान करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-१०-२०२०) :** (१) होय, निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) व (३) चंद्रपूर शहर महानगरपालिकेअंतर्गत, यांत्रिकी विभागातील व पाणीपुरवठा विभागातंर्गत सेवा सहकारी संस्थेमार्फत कंत्राटी तत्वावर कर्मचारी नियुक्त करण्यात आलेले आहेत. या संस्थेस किमान वेतन कायद्यानुसार कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीनुसार वेतन व भत्ते प्रदान करण्यात येत आहेत.

---

## सन १९७५ ते १९७७ मधील आणीबाणी च्या काळात बुलढाणा जिल्ह्यातील कारावास झालेल्यांना मानधन मिळणेबाबत

**(५०) १४६५४ (१९-०९-२०२०). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन १९७५ ते १९७७ मध्ये आणीबाणीच्या काळात लोकशाहीकरीता बुलढाणा जिल्ह्यातील अनेक लोकांना कारावास सोसावा लागला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र शासनाने अशा कारावास सोसलेल्या लोकांसाठी मानधन देणे सुरू केलेले आहे तथापि बुलढाणा जिल्ह्यातील काही कारावास सोसलेल्यांना मानधन मिळाले नसल्याने जिल्हाधिकारी बुलढाणा यांनी दिनांक २४ जुन, २०१९ रोजी वा त्यासुमारास उपसचिव, सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई यांच्याकडे त्यांना मानधन देण्याबाबत माहिती सादर केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने बुलढाणा जिल्ह्यात आणीबाणीमध्ये कारावास झालेल्या नागरीकांना मानधन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे (१३-१०-२०२०) :** (१) होय.

(२) होय

(३) कोविड-१९ या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भावामुळे सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात राज्याची कर व करेतर उत्पन्नातील अपेक्षित महसूली घट व त्याचे राज्याच्या अर्थव्यवस्थेवर होणारे परिणाम विचारात घेवून दि.०२/०६/२०२० रोजी मा.मंत्रीमंडळाच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानूसार “सन १९७५-७७ या आणीबाणीच्या कालावधीत लोकशाहीकरिता लढा देणा-या व्यक्तींचा सन्मान/यथोचित गौरव करण्यासंबंधी धोरण (प्रधान लेखाशीर्ष ए-५, २२३५ सी२०५)” या कार्यक्रमाची अंमलबजावणी बंद करण्याचा व कार्यक्रमातील प्रलंबित दायित्वाचे निराकरण

या विभागाच्या मंजूर अर्थसंकल्प तरतुदीतून करण्याचा निर्णय दि.३१/०७/२०२० च्या शासन निर्णयान्वये घेतला आहे. सदर कार्यक्रमातील प्रलंबित दायीत्वाचे निराकरण या विभागाच्या मंजूर अर्थसंकल्प तरतुदीतून करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.